# परिणति

(सचित्र)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९६५६३ नों दि 31-5-66
वि. ...

सुरेश शर्मा

IRBK-0116563
IRBK-0116563

रम्यकथा प्रकाशन, पुणें–३०

मूल्य : २॥ रुपये

प्रकाशक :

वा. ग. मेहेंदळे,
रम्यकथा प्रकाशन,
३९२ नारायण पेठ,
कान्हेरे बिल्डिंग, पुणें-३०.

प्रथमावृत्ति : मार्च १९७६

पुनर्मुद्रणाचे सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :

वा. ग. मेहेंदळे,
जयभारत मुद्रणालय
५५१ बुधवार पेठ, पुणें २.

# समर्पण

**माझी सून सौ. मेधा हिला–**

प्रिय मेधे, शब्दकोशांत तुझ्या नांवाचा बुद्धि किंवा चातुर्य असा अर्थ दिलेला असून, ज्याअर्थी तू आज शासकीय अधिकार-पदावर आहेस, त्याअर्थी कदाचित ते दोन्ही गुण तुझ्यांत असावेत असें वाटतें; पण...

तुझे आजेसासरे किंवा माझे चुलते कै. वासुदेवराव (आम्ही त्यांना भाऊ म्हणत असूं.) हेहि शासकीय वरिष्ठ अधिकारीच होते; तथापि ते अतिशय प्रामाणिक असल्यामुळें तत्कालीन ब्रिटिश शासनानें त्यावेळीं रत्नागिरीला नजरकैदेंत ठेवलेल्या ब्रह्मदेशाच्या थिबा राजाचे व्यवस्थापक म्हणून त्यांची नेमणूक केली होती.

त्या बौद्धधर्मीय राजापाशीं दोन सजीव कन्यारत्नांव्यति-रिक्त एक निर्जीव रत्नमंजूषा होती. तिच्यांतलें एकेक रत्न तो दररोज देवपूजेसाठीं वापरत असे अन् दुसऱ्या दिवशीं निर्माल्यांतलें तें रत्न त्याच्या सेवकांमार्फत अल्प किंमतीला विकलें जात असे; त्यामुळें त्या काळीं रत्नागिरी नगरी अक्षरशः रत्नमयी बनली होती! सर्वसामान्य माणूसहि त्या काळीं रत्नाची अंगठी किंवा बटणें वापरीत होता!

कै. भाऊंना त्या वाहत्या गंगेंत यथेच्छ अवगाहन करतां आलें असतें, निदान आपले हात धुवून घेतां आले असते; पण ते जळांत असतांहि पद्मपत्राप्रमाणें कोरडे राहिले होते! त्यांच्या

सदऱ्याचीं सुती बटणें त्यांच्या अंतकाळापर्यंत कधींहि बदललीं नव्हतीं ! कोटहि सोलापुरी चेकचाच असे !

मेधे, तूंहि आपल्या आजेसासऱ्यांचा आदर्श समोर ठेव अन् जनीं जनार्दन, जगीं जगन्नाथ नि विश्वीं विश्वंभर या तत्त्वाला अनुसरून आपल्या अधिकारपदाची अंमलबजावणी कर. हाच तुला माझ्या अखेरच्या आयुष्यांतला आदेश !

तुझा चिरशुभेच्छु,

सुरेश शर्मा

# परिणति

म. ग्रं. ग्रा
दा. क्र. 98653 3/10/0
वि. ग्रा. वा.

## एक

क्षमाशस्त्र जया नराचिये हातीं । दुष्ट तयाप्रती काय करी ? ।।
तृण नाहीं तेथें पडला दावाग्नि । जाय तो विझोनी आपसया ।।
तुका म्हणे क्षमा सर्वांचें स्वहित । धरा अखंडित सुखरूप ।।

पलमव नि त्याच्याबरोबरचे इतर निरपराधी लोक यांना हर्षानें हत्तीकडून ठार मारविल्याचें पाहिल्यावर टीकमला अतिशय वाईट वाटलें ! सम्राट हर्षवर्धनानें केलेला अन्याय त्याला असह्य झाला. तो मनांत उद्विग्न झाला. त्या लोकांची नीट चौकशी न करतां हर्षानें त्यांना हत्तीकडून ठार मारविलें होतें. हर्ष इतका कठोर कां व्हावा तें टीकमला कळत नव्हतें. तसें पाहिलें, तर हर्ष फारच दयाळू होता. कदाचित त्याला आपल्या मरणाची भीति वाटली असेल नि त्यामुळें तो क्रोधाविष्ट बनला असेल. जर त्यानें मनांत आणलें असतें, तर निदान पलमवाला तरी क्षमा केली असती; पण त्यानें एकाहि इसमाला क्षमा केली नाहीं !

हर्षाकडून न्यायाच्या बाबतींत झालेला अन्याय टीकमला असह्य झाल्यानें तो आपल्या आईला म्हणाला, ‘आई, माणूस

कधीं कधीं इतका कठोर बनतो कीं, त्यावेळीं तो मागचापुढचा विचारच करीत नसतो. त्याची वागणूक आंधळयासारखी असते. तो मूळचा सुविचारी असला, तरी प्रसंगीं तो कुविचारी बनतो.'

आपल्या मुलाचें कांहींतरी बिनसलें आहे नि त्यामुळें तो असें बोलतो आहे असें टीकमच्या आईला वाटलें.

ती टीकमला म्हणाली, 'काय झालें बाळा ? तुला कुणी भलतेंच कांहींतरी सांगितलें का ?'

त्यावर टीकम तिला म्हणाला, 'आई, जोंपर्यंत माझे बाबा हयात आहेत, तोंपर्यंत मला भलतेंच कांहींतरी सांगणारा कुणीहि भेटणार नाहीं; पण काल सम्राटांनीं कित्येक निरपराधी लोकांना जें हत्तीकडून ठार मारविलें, तें करुण दृश्य कांहीं केल्या माझ्या डोळयांपुढून जात नाहीं. त्यांच्यांतल्या एका इसमाला मी नि बाबा असे दोघेहि ओळखत होतों. त्याला सोडून देण्यासाठीं आम्ही सम्राटांची विनवणीहि केली; पण आमची विनवणी त्यांनीं धुडकावून लावली ! अरेरे ! त्या मदोन्मत्त हत्तीनें एकेका इसमाला जमिनीवर जोरानें आदळून ठार मारलें ! सारे बिचारे न बोलतांच मरून गेले. किती भयानक दृश्य होतें तें ! तें दृश्य ज्यानें ज्यानें पाहिलें होतें, त्याच्या त्याच्या डोळयांवाटे अश्रूंच्या धारा वहात होत्या !'

टीकमची आई त्याला म्हणाली, 'बाळा, राजामहाराजांना सामान्य माणसांची किंमत नसते ! सामान्य माणसें हीं त्यांच्या लेखीं जंगली जनावरेंच असतात. सम्राटांनीं आतांपर्यंत कितीतरी माणसांना देहांताची शिक्षा दिली आहे; पण त्या बाबतींत तुला दुःखी होण्याचें काय कारण ?'

टीकम त्यावर कांहींच बोलला नाहीं !

त्याची आई तिथून उठली नि आपली घरांतलीं कामें उरकण्यासाठीं निघून गेली.

टीकम बसल्या बसल्या मनांत विचार करूं लागला, 'एका निरपराधी माणसाला सम्राटांनीं देहांताची शिक्षा दिली; पण त्यांचें तें करणें योग्य नव्हे कांहीं. सम्राट त्याला खरा न्याय समजतात का? त्यांचा तो न्याय नसून तो अन्याय आहे! बिचाऱ्या खेलाला ही गोष्ट कळली, तर तिच्या मनावर केवढा अनिष्ट परिणाम होईल? माझ्याकडून आपल्याला कोणतीतरी चांगली बातमी कळेल, या आशेनें त्या दोघी मायलेकी आपल्या घरीं माझी वाट पहात बसल्या असतील; पण कुणाचा पति अन् कुणाचा पिता या जगांत जिवंत राहिलेला नसून, तो जिथून परत येतां येणार नाहीं अशा परलोकांत निघून गेला आहे, हें त्या बिचाऱ्यांना काय ठाऊक? माणसांच्या दुनियेपेक्षां देवाची दुनिया निराळी असते. देव आपल्या बसल्या जागेवरून स्वस्थपणें सारें कांहीं पहात असतो नि इकडे माणसें माणसांचे प्राण घेत असतात. माणसांना मारून टाकण्याच्या बाबतींत त्यांना थोडासुद्धां संकोच वाटत नाहीं. आपला बाप वारला ही गोष्ट टिकोलीला कळली, तर खरोखरच तिला वेड लागेल. ती अन्नवस्त्राचा त्याग करील...'

विचार करतां करतां टीकमनें एक दीर्घ उसासा सोडला नि तो आपल्या पलंगावर पालथा पडला.

कांहीं वेळानें त्याची आई तिथें आली नि तिनें आपला मुलगा पलंगावर अस्ताव्यस्त पडला असल्याचें पाहिल्यावर त्याच्या मनांतून ती गोष्ट गेली नसल्याचें तिनें ओळखलें.

ती त्याला म्हणाली, 'बाळा, अशाप्रकारें अस्ताव्यस्त पडून रहाण्यांत काय हांशील? समजदार माणसें गेल्या गोष्टींचा विचार करून पस्तावत नसतात कधीं!'

टीकम म्हणाला, 'आई, तुझें म्हणणें खरें आहे. मी ती गोष्ट मनांतून काढून टाकण्यासाठीं बराच प्रयत्न केला; पण त्या निरपराधी माणसाचा चेहरा माझ्या नजरेपुढून कांहीं केल्या हलत नाहीं! त्या बिचाऱ्याच्या दावतींत कोणताच पुरावा नव्हता; पण सम्राटांनीं त्याचा नाहक प्राण घेतला. त्या कोल जातीच्या माणसाला माझ्या मनांतून कसें काढावें, तेंच कळेनासें झालें आहे मला.'

टीकमच्या आईनें त्याच्या डोक्यावरून हात फिरविला नि त्याला म्हणाली, 'बाळा, तूं आज सेनानायकाच्या अधिकारपदावर आहेस. तुला न्याय अन्यायाचें ज्ञान अधिक असलें पाहिजे; तथापि राजानें केलेली आज्ञा न्याय्य होती असें माझें मत आहे. आमच्या-सारख्या सामान्य माणसांच्या दृष्टीनें तो अन्याय असला, तरीहि तो न्यायच आहे! त्यांतहि आमचे सम्राट आपण समजतों तितके अन्यायी नाहींत! सम्राटांनीं ज्या लोकांना देहांताची शिक्षा दिली, त्या लोकांविरुद्ध कितीतरी पुरावे त्यांनीं पूर्वींच जमवून ठेवले असतील. आपल्यापासून इतरांना त्रास झाला, तर त्यांना फार वाईट वाटतें हें मला माहीत आहे. मी त्यांना तुझ्यापेक्षांहि जास्त ओळखतें.'

टीकम म्हणाला, 'आई, तूं म्हणतेस तसें असेलहि कदाचित; तथापि पलमवाची पाळी आल्यावर त्याला सोडून देण्यासाठीं बाबांनीं हात जोडून सम्राटांची विनवणी केली! दुसरा तिसरा कुणी असता, तर त्यावेळीं त्याचें मन कळवळलें असतें; पण सम्राटांच्या अंतःकरणाला त्यावेळीं पाझर फुटला नाहीं! त्यांनीं बाबांची विनवणी धुडकावून लावली नि तो बिचारा पलमव फार मोठा गुन्हेगार आहे असें ठरवून त्याला हत्तीकडून ठार मारविलें.'

त्यावर टीकमची आई त्याला म्हणाली, 'बेताल बडबड

मला मुळींच आवडत नाहीं. ऊठ नि थोडेसें पोटांत घाल कांहींतरी. कालपासून उपाशी आहेस तूं!'

टीकमनें आपल्या डोळ्यांतले अश्रु पुसले नि तो तिच्या-बरोबर स्वयंपाकघरांत निघून गेला; तथापि स्वयंपाकघरांत जातांना त्याला खेला नि टिकोली यांची याद येत होती.

त्यांच्या बाबतींत तो वारंवार विचार करीत असे नि विचार करतां करतां त्याचें दुःख वाढत असे.

असें करतां करतां एक दिवशीं त्याचें दुःख त्याला आवरे-नासें झालें, म्हणून तो कुणाला न सांगतां आपल्या घराच्या मागच्या बाजूला गेला. तिथें घोड्यांचा तबेला होता. त्यानें त्या तबेल्यांतला एक घोडा सोडला, त्याची पाठ थोपटली, त्याच्यावर स्वार झाला नि त्यानें त्या घोड्याला टांच मारली. घोडा नाग-वनाच्या दिशेनें चौखुर धांवूं लागला !

नागवनांत जातांना जंगलांतून जावें लागत असे. वेळ संध्याकाळची होती. सर्वसाक्षी सहस्ररश्मि सविता संध्यादेवीच्या महालांत जाण्यासाठीं आसुसला होता; त्यामुळें त्याचाहि एकचक्री रथ पश्चिम दिशेकडे वेगानें धांवत होता. जंगलांतील झाडांच्या शेंड्यांवर सूर्याचे सोनेरी किरण पसरले होते, म्हणून त्या किरणांत ते चमकत होते. आकाशाचा रंगहि लालेलाल दिसत होता !

बराचसा पल्ला गांठल्यावर टीकमनें आपल्या घोड्याचा वेग कमी केला. कदाचित त्याची नजर समोर गेली असेल. कारण त्यावेळीं आकाशांत ढगांची गर्दी होऊं लागली होती !

टीकम मनांत घाबरून गेला. त्याला अजून बरेंचसें अंतर तोडायचें होतें; त्यामुळें मध्यंतरीं काय घडेल कुणास ठाऊक अशी त्याला धास्ती वाटूं लागली. तो धास्तावून गेला खरा; पण त्यानें आपला धीर सोडला नाहीं. तो पुढें पुढें जाऊं लागला. त्यानें एक

मोठें मोकळें मैदान पार पाडलें; पण तितक्यांत सभोंवार काळोख पसरला. सूर्यहि मावळला होता, म्हणून त्याला त्या काळोखांत झाडपेड दिसेनासें झालें !

'मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यद्विचिंतयेत् !' अशी त्याची अवस्था झाली. घरांतून बाहेर पडतांना 'आज अनेक अडचणी आल्या, तरी अस्तमानाच्या आंत मी नागवन गांठणारच गांठणार !' अशी त्यानें मनांत प्रतिज्ञा केली होती; पण निसर्गानें त्याच्या त्या प्रतिज्ञेचा चक्काचूर करून टाकला नि त्याबरोबर मनुष्य स्वतःला कितीहि मोठा समजत असला, तरी निसर्गापुढें त्याचें मोठेंपण थिटें पडतें हें त्यानें टीकमला प्रत्यक्ष दाखवून दिलें. इच्छा असूनहि टीकमला कांहींच करतां येईनासें झालें !

टीकम एका मोठ्या झाडाखालीं उभा राहिला; पण तितक्यांत जोराचें वादळ सुरू झालें. झाडांच्या फांद्या जवळपास असलेल्या झाडांच्या फांद्यांवर घांसूं लागल्या. वाऱ्यामुळें त्या फांद्या खालीं वांकल्या कीं टीकमचें काळीज धडधडूं लागे. तें झाड कोसळून आपल्या अंगावर पडेल कीं काय अशी त्याला भीति वाटे; पण तितक्यांत वाऱ्याचा दुसरा झोत येई नि त्यामुळें खालीं वांकलेली फांदी पुन्हां वर जाई. असा प्रकार बराच वेळ चालला होता, म्हणून आपण आतां पुढें काय करावें या विचारांत तो पडला; तथापि त्याला वादळ थांबण्याचें चिन्ह न दिसल्यामुळें तो पुढें चालूं लागला !

पण तें वादळ त्याला पुढें जाऊं देत नव्हतें. त्याला चोहोंकडे धूळच धूळ दिसत होती. ती धूळ घोड्याच्या नाकांत शिरत होती, म्हणून त्याला पुढें चालतां येणें अशक्य होत होतें. पुढें जात असलेला घोडा वारंवार मागें परतूं पहात होता; पण टीकम टांचा मारून त्याला पुढें चालविण्याचा प्रयत्न करीत होता !

तितक्यांत त्याच्या घोड्याला ठोकर लागली नि तो खालीं पडतां पडतां सांवरला. तें पहातांच टीकमनें लगाम खेचून त्याला जागच्या जागीं थांबविलें.

वादळाचा जोर कमी झाला होता. मळभटहि निवळत चालली होती. तो घोडा मंदिराच्या एका पायथ्यापाशीं उभा असल्याचें टीकमला दिसलें. त्याला त्या पायरीची ठेंच लागली होती; पण दाट मळभटीमुळें टीकमला ती पायरी किंवा तें मंदिर दिसलें नव्हतें.

टीकम घोड्यावरून खालीं उतरला तेव्हां मंदिराच्या आंतील भागांत त्याला प्रकाश दिसला, म्हणून तो मनांत म्हणाला, 'कदाचित आजची रात्र मला या रानांतच काढावी लागेल नि त्यामुळें मला नागवनांत जातां येणार नाहीं!'

अन् त्या विचारामुळें त्याचें काळीज धडधडूं लागलें. असें असलें, तरी त्याचा धीर मात्र सुटला नव्हता!

कांहीं वेळानें तो त्या मंदिराच्या पायऱ्या चढूं लागला. कदाचित आंतल्या भागांत आपला कुणीतरी शत्रु लपून बसला असेल असें त्याला वाटल्यामुळें त्यानें म्यानांतली तलवार उपसली नि ती नागवी तलवार हातांत घेऊन तो पायऱ्या चढूं लागला.

मंदिराच्या पायऱ्या चढतां चढतां टीकमच्या मनांत दुसरा एक नवा विचार आला, 'जंगलांत मंगल अशी अवस्था आहे ही! या निर्जन अरण्यांत हें सुंदर मंदिर कुणी बरें बांधलें असेल? एखाद्या धनिकानें किंवा एखाद्या राजानें हें मंदिर बांधलें असलें पाहिजे!'

विचार करतां करतां तो बाहेरच्या उंबरठ्यापर्यंत जाऊन पोहोंचला, तेव्हां त्याला आंतल्या गाभाऱ्यांत भगवान् बुद्धाची

ध्यानस्थ स्वरूपांत असलेली पाषाणी प्रतिमा दिसली नि ती पाहिल्यावर तें बुद्धमंदिर असल्याचें त्यानें ओळखलें !

तो आश्चर्यचकित झाला नि त्याचवेळीं तो मनांत विचार करूं लागला, 'आजची रात्र मी या मंदिरांत काढीन नि सकाळीं निजून उठल्यावर नागवनांत जाईन; पण मी निजूं कुठें ?'

मनांत अशा प्रकारचा विचार केल्यावर तो झोंपण्यालायक अशी जागा शोधूं लागला; पण तितक्यांत त्याला आंतल्या भागांतून कसला तरी आवाज ऐकूं आला ! तो आवाज कानीं पडतांच टीकम चपापला नि आजूबाजूला पाहूं लागला; तथापि त्याला कुणीच दिसलें नाहीं !



आंत कोण आहे तें पहाण्यासाठीं तो उंबरठ्यावरून खालच्या दालनांत उतरला नि जरासा पुढें गेला, तेव्हां गाभाऱ्यांत बसलेल्या दोघी स्त्रिया बुद्धाची पूजा करीत असल्याचें त्याला दिसलें. त्यानें हि हात जोडले, डोळे मिटले नि तो तिथेंच उभा राहिला ! तो तिथें बराच वेळ उभा राहिला होता, पण जेव्हां त्याचें ध्यान संपलें नि त्यानें आपले डोळे उघडले, तेव्हां टिकोली नि तिची आई या दोघीहि तिथें उभ्या असल्याचें त्याला दिसलें !

गाभाऱ्यांत पाठमोऱ्या बसलेल्या ज्या दोन स्त्रिया आपल्याला दिसल्या होत्या, त्या स्त्रिया याच होत्या असें टीकमला वाटलें. नव्हे, तशी त्याची खात्रीच होऊन चुकली. त्याला अतिशय आनंद झाला !

ज्या दोघींसाठीं तो भलेंमोठें रान तुडवीत आला होता, त्या दोघीहि स्त्रिया त्या बुद्धमंदिरांत त्याला भेटल्या होत्या. अगदीं त्याच्यासमोर उभ्या होत्या !

टीकमनें टिकोलीच्या आईला विचारलें, 'माताजी, आपण इथें आलांत तरी कशा ? हें मंदिर निर्जन अरण्यांत आहे अन् ही वेळ तर रात्रीची आहे. अशा स्थितींत इथें येतांना तुम्हांला भीतिबिती नाहीं का वाटली ?'

त्यावर खेला म्हणाली, 'कसची भीति नि कसचें भय आम्हांला ? आम्ही बोलून चालून जंगली माणसें. इथेंच आमचें जनन नि इथेंच आमचें मरण ! बरें, इतकेंहि करून हें मंदिर नागवनाच्या निकट असल्यानें दर पुनवेला आम्ही बुद्धदेवाची पूजा करण्यासाठीं या मंदिरांत येत असतों. आज पौर्णिमा असल्यानें आम्ही इथें आलों; पण तूं इथें केव्हांसा आलास बाळा ?'

टीकम म्हणाला, 'मी आज दुपारीं स्थानेश्वराहून निघालों. नागवनांत जाणार होतों मी; पण वाटेंत वादळ सुरू झालें म्हणून मी एका झाडाखालीं उभा राहिलों. तें थोडेंसें थांबल्यावर मी पुढच्या मार्गाला लागलों; तथापि रात्र पडली नि हें मंदिर दिसलें म्हणून आजची रात्र इथें काढावी असा मनांत विचार करून मी या मंदिरांत आलों असतां तुम्हा दोघींची भेट झाली. आतां मला सांगा, आपण खुशाल आहांत ना ?'

खेला म्हणाली, 'आम्ही दोघीहि सुखरूप आहोंत; पण टिकोलीच्या वडिलांचा तपास लागला का तुला ?'

टीकम घाबराघुबरा झाला नि म्हणाला, 'त्यांचा तपास लागला; तथापि ते......'

खेला अधीर झाली नि तिनें दुःखी स्वरांत त्याला विचारलें, 'काय झालें त्यांचें ? कुठें गेले ते ?'

टीकमनें दीर्घ उसासा सोडला नि तो खेलाला म्हणाला, 'टिकोलीचे बाबा आतां नागवनांत कधींहि यायचे नाहींत !'

अन् त्यानंतर पलमवाच्या बाबतींत घडलेली सारी हकीकत त्यानें खेलाला सांगितली.

त्याची ती करुणकथा ऐकतांच दोघीहि मायलेकींनीं हंबरडा फोडला.

त्यांचा तो हंबरडा कानीं पडतांच त्या मंदिराच्या एका खोलींत झोंपलेला एक साधु तिथें आला नि तो रडत असलेल्या मायलेकींचें सांत्वन करण्यासाठीं त्यांना म्हणाला, 'या संसारांत देव जें कांहीं करीत असतो तें माणसांच्या बऱ्यासाठींच करीत असतो, म्हणून त्याच्याबद्दल कधींहि दुःख करीत बसूं नये. एखाद्या माणसाच्या मृत्यूनंतर त्याच्या नात्यागोत्याचीं माणसें रडूं लागलीं तर मरणाऱ्या माणसाच्या आत्म्याला अतिशय दुःख होत असतें, त्यासाठीं तुम्ही दोघीहि आपलें दुःख आवरा नि त्याच्या आत्म्याला सद्गति मिळो, अशी बुद्धदेवाकडे प्रार्थना करा !'

त्या दोघीहि मायलेकींना त्या साधूचें सांगणें आवडलें; पण त्यांना आपले अश्रु मात्र आवरतां येईनातसे झाले.

म्हणतां म्हणतां मध्यरात्र टळून गेली. त्या दोघींचें सांत्वन करतां करतां टीकमहि थकून गेला; पण त्याच्या सांत्वनाचा त्या दोघींच्या मनांवर थोडासुद्धां परिणाम झाला नाहीं.

टीकम आधींच प्रवासामुळें दमून भागून गेला होता त्यानंतर रात्रीं त्याच्या पोटांत घांसभर अन्नहि पडलें नव्हतें; त्यामुळें

त्या दोघींना समजावतां समजावतां त्याला चटकन झोंप लागली.

टीकमला झोंप लागली; पण टिकोली नि खेला यांना मात्र झोंप लागली नाहीं. त्या दोघीहि रात्रभर जाग्या होत्या नि पलमवाविषयीं आपापसांत बोलत बसल्या होत्या.

टीकम दुसऱ्या दिवशीं सकाळीं निजून उठला, तेव्हां टिकोली नि खेला या दोघी आपापसांत बोलत असल्याचें त्याला दिसलें. त्याला आश्चर्य वाटलें.

टिकोली टीकमला म्हणाली, 'माझी आई रात्रभर माझ्या बाबांविषयीं माझ्याशीं बोलत बसली होती. आतां आपण तरी तिला समजावून सांगा ना !'

टीकम म्हणाला, 'माताजींच्या मनावर शोकाघात झाला आहे. त्यांना समजावून सांगितलें, तरी तें सांगणें फुकट जाईल. आपल्या मनाला त्यांनीं स्वतःच समजाविलें पाहिजे !'

कांहीं वेळानें टीकम त्या मायलेकींसोबत नागवनाकडे निघून गेला.

◆ ◆

# दोन

हर्षाला राज्याधिकार प्राप्त झाल्यावर त्यानें स्थानेश्वरांतले विद्वान नि मुत्सद्दी यांना निमंत्रणें पाठवून त्यांचें सम्मेलन भरविलें. सारे निमंत्रित सम्मेलनाला आल्यावर त्यांच्या संमतीनें एक समिति स्थापन करण्यांत आली.

राजाला त्याच्या राजकार्यांत मदत करणें हें त्या समितीचें काम होतें. सम्राट फक्त त्या समितीच्या सभासदांची संमति घेत असे; तथापि राज्यांतलीं मोठमोठीं नि जबाबदारीचीं कामें तो त्या सदस्यांकडे कधींहि सोंपवीत नसे. राजानें तसलीं जबाबदारीचीं कामें समितीच्या सभासदांकडे सोंपविलीं, तर राजाचा मान कमी होतो, त्याच्या सन्मानाला बट्टा लागतो, ही गोष्ट त्याला चांगली ठाऊक होती; म्हणून राजकारभारांतलीं किरकोळ कामें त्यानें समितीच्या सदस्यांकडे सोंपविलीं होतीं अन् मोठमोठीं नि जबाबदारीचीं कामें स्वत: स्वीकारलीं होतीं !

अशा प्रकारें कांहीं दिवस निघून गेले. राज्यांतले सारे लोक सम्राटाच्या कार्याची वाखाणणी करूं लागले. सारे लोक हर्षाचें

गुणगान करूं लागले ! त्याच्या प्रजाजनांकडून त्याच्यावर स्तुति-सुमनांचा वर्षाव होऊं लागला !

'राजास विश्रम तसा क्षणमात्र नाहीं !' या कविवचनानुसार हर्षाला सहसा विश्रांति मिळत नसे. तो आपल्या राज्यकारभारांत जातीनें लक्ष घालीत असे; तथापि त्यांतल्या त्यांत त्याला थोडीशी सवड मिळाली, कीं तो एकांतांत जाऊन बसे नि भारतांतल्या इतर राजांना कसें जिकतां येईल त्याबद्दल तासचेतास विचार करीत असे !

स्थानेश्वराचें साम्राज्य साऱ्या भारतांत पसरलें जावें अशी त्याची इच्छा होती. त्याचप्रमाणें त्याची दुसरीहि एक तशाच तऱ्हेची इच्छा होती. जे लहानसहान राजे आपल्या राज्यांतील प्रजेला निष्कारण छळीत असतात, तिला दंडशिक्षा करीत असतात, त्या राजांना आपण वठणीवर आणायचें अर्थात् आपलें मांडलीकत्व स्वीकारायला लावायचें. शेवटीं विचार करतां करतां त्याला असें वाटलें कीं, 'जर कोणत्याहि राजाला युद्धांत जिकायचें असेल, तर प्रथम आपण आपल्या राज्याचें सैनिकी सामर्थ्य वाढविलें पाहिजे अन् आपल्याला तसें करतां आलें नाहीं, तर आपण इतर राजांकडून पराभूत झाल्याशिवाय रहाणार नाहीं.'

मनांतला विचार पक्का झाल्यावर त्यानें आपल्या राज्यांतले सैनिक वाढविण्यास नि जुन्यानव्या सैनिकांना सुधारित सैनिकी शिक्षण देण्यास सुरवात केली.

हर्ष राजा आपलें सैन्य वाढवीत असल्याची बातमी इतर राजांना कळल्याबरोबर त्यांची घाबरगुंडी उडाली ! ते सारे राजे भयभीत होऊन गेले. कित्येक राजांनीं हर्षवर्धनाशीं तह केला, तर कित्येकांनीं त्याच्या दरबारांत आपले दूतहि पाठविले. त्या दूतां-

कडून त्यांच्या राजांना हर्षाच्या दरबारांतल्या बित्तंबातम्या कळूं लागल्या.

वैधव्य प्राप्त झाल्यावर माहेरीं आलेली राज्यश्री आपल्या महालांत प्रसन्न चित्तानें वावरत होती. राजमहालांतल्या साऱ्या राजमहिषी तिच्यावर प्रेम करीत होत्या. हर्षाला वेळ मिळाला कीं तो राणीवशांत जाऊन तिच्याशीं राज्यकारभाराविषयींच्या गोष्टी बोलत बसे.

एक दिवशीं दुपारच्या भोजनानंतर हर्षवर्धन एका सभेंत जाऊन बसला. त्या सभेसाठीं राज्यांतल्या साऱ्या कर्मचाऱ्यांना बोलावण्यांत आलें होतें

राज्यकारभारासंबंधींच्या इतर गोष्टींची चर्चा आटोपल्या-वर हर्ष त्यांना म्हणाला, 'आतां आपल्या राज्यांत चोहोंकडे शांतता आहे. राज्यांतली सारी प्रजा आपलें आयुष्य आनंदानें घालवीत आहे; त्यामुळें आपण चोहोंकडे विजयदुंदुभी ध्वनित करावा अशी माझी इच्छा आहे.'

सेनापति भांडी उठून उभा राहिला नि म्हणाला, 'चोहों-कडे विजयाचा डंका पिटावा अशी माझीहि इच्छा आहे. त्यामुळें स्थानेश्वराच्या राज्याचा दरारा वाढेल.'

त्या काळीं मुख्य मंत्र्याला 'प्रधानामात्य' असें म्हणत असत.

सेनापतीनंतर प्रधानामात्य उठून उभा राहिला नि हर्षाला उद्देशून म्हणाला, 'महाराज, चोहोंकडे स्थानेश्वराचें राज्य स्थापित करण्याला हीच संधि योग्य आहे. अशी सुवर्णसंधि पुन्हां प्राप्त होईल कीं नाहीं तें सांगतां यायचें नाहीं. कारण, यावेळीं आमच्या राज्यावर निसर्गानें पूर्ण कृपा केली आहे. यावेळीं मला एक कविवचन आठवलें. तो कवि म्हणतो–

ये एकदांचि उदया अनुकूल वेळा ।
ती साधिल्या करि अखंड समुन्नतीला ।।
जो मंदबुद्धि परि ती दवडील वायां ।
आजन्म दुःखचि तया शिणवोनि काया ।।

या कविवचनाचा विचार करायचा झाला तर अशी सोन्या-सारखी संधि आपण फुकट घालवितां कामा नये असें मला वाटतें. आज आपल्या स्थानेश्वर राज्यांतले लोक आरामांत शेतीभाती करीत असून आपलें आयुष्य सुखांत घालवीत आहेत. आपल्या राज्यांत धनधान्याची लयलूट आहे. शासनहि एकसूत्रानें बांधलें गेलें आहे. आपल्या राज्यांत पैशाअडक्याची काडीमात्र कमतरता नाहीं ! राज्यश्रीताई परत आपल्या माहेरीं आल्या असून, त्याहि आपलें आयुष्य आनंदांत घालवीत आहेत. उत्तर भारतांतले सारे सधन निर्धन लोक आपलीं स्तुतिस्तोत्रें गात आहेत. अशा स्थितींत राज्यविस्ताराची इच्छा बाळगणें ही गोष्ट अनुचित आहे असें मला वाटत नाहीं. आपल्याला विरोध करील असा एकहि राजा आपल्या आजूबाजूच्या राज्यांत सांपडणार नाहीं. '

त्यावर हर्ष म्हणाला, ' ठीक आहे. मी आज राजपुरोहितांना बोलावणें पाठवितों नि त्यांना चांगली वेळ केव्हां आहे तें ज्योतिष्याला विचारण्यास सांगतों. नंतर कोणत्या सुमुहूर्तावर विजयदुंदुभी ध्वनित करावा तें राजपुरोहित आपल्याला सांगतील.'

सभेंतल्या साऱ्या सभासदांनीं सम्राटाच्या आदेशाचा स्वीकार केला.

त्यानंतर कांहीं दिवस निघून गेले

एक दिवशीं सम्राटानें आपली चतुरंग सेना सज्ज केली नि निरनिराळ्या राजांना जिंकण्यासाठीं तो स्वारीवर निघाला.

त्यावेळचें तें दृश्य खरोखरीच विलोभनीय होतें.

स्थानेश्वर शहरांतल्या साऱ्या बाजारपेठा बंद करण्यांत आल्या होत्या. शहरांतले पुरुष, स्त्रिया नि मुलें हीं एकत्र जमून सेनेचें संचलन पहात होतीं. ज्या मातांचे मुलगे रणांगणावर जात होते, त्या माता आपापल्या मूलांना विजयी होण्याबद्दल शुभाशीर्वाद देत होत्या. ज्यांचे नवरे रणांगणांवर जात होते, त्या बायका आपापल्या नवऱ्याकडे प्रेमानें पहात होत्या. त्यांच्या कडेवर असलेलीं मुलें रडून रडून आकांत करीत होतीं. मंदिरांतल्या घंटा जोराजोरानें वाजत होत्या नि त्या आपल्या नादाच्या द्वारें ‘ शुभास्ते पंथान: सन्तु ’ अशी शुभेच्छा व्यक्त करीत होत्या; तथापि सम्राट मात्र मध्यें मध्यें न थांबतां आपल्या सेनेसह ‘ आगेकूच ’ करीत होता. त्याला मागें वळून पहाण्याइतकी सवडच नव्हती ! त्या सेनेची मोजदाद करणें हें काम सहजसोपें नव्हतें. अगणित सेना होती ती !

सेनेंतल्या त्या ‘ जवानां च्या अंगांतलें रक्त सळसळत होतें.

त्या जवानांना विजयाची नशा चढली होती.

त्या नशेंत असलेले ते तरुण सैनिक ढाल, तलवार, धनुष्यबाण इत्यादि आयुधांनिशीं पुढें पुढें चालत होते नि चालतां चालतां ते खालील ‘ गतिगीत ’ उच्च स्वरांत गात होते–

जय जय जय
जय जय जय
मनीं धरा दृढनिश्चय ! ॥ ध्रु० ॥
कूच करा
दूर चला
सोडा सगळा संशय ! ॥
जय जय जय
जय जय जय
मनीं धरा दृढनिश्चय ! ॥ १ ॥

कशाहि विघ्ना भिऊं नका ।
कदापि मागें वळूं नका ! ।
मेघ गर्जती
बिजली चमके
वृक्ष धरेवरती पडती ।
हंसतमुखानें
होउनि निर्भय
चला, करा वज्रहृदय ।
जय जय जय
जय जय जय
मनीं धरा दृढनिश्चय ! ॥ २ ॥
दंभ, द्वेष हे
शत्रु आपुले
आणिति सत्कार्यांत अडथळे ।
पुढें होउनी
ठोका त्यांसी
मिळवा त्यांवरति विजय ! ।
जय जय जय
जय जय जय
मनीं धरा दृढनिश्चय ! ॥ ३ ॥
भारत आहे
देश आपुला
तसाचि तोही देव आपुला
आम्ही त्याची
कीर्ति वाढवूं
ठेवा हें विमल ध्येय ! ।

जय जय जय
जय जय जय
मनीं धरा दृढनिश्चय ! ॥ ४ ॥

सम्राटाचा सुसज्जित रथ सर्वांच्या पुढें होता. त्या रथाची सजावट पाहून सारे लोक आश्चर्यचकित होत होते; कारण, तशा प्रकारचा रथ त्यांनीं त्यापूर्वीं कधींच पाहिला नव्हता. जणूं सम्राट हर्ष इंद्राच्या रथावर आरूढ झाला होता. हिऱ्यामोत्यांनीं सजविलेला तो रथ चंद्रासारखा चकाकत होता.

अन् सम्राट हर्ष पुढें पुढें चालला होता. सारीं राज्यें जिंकून तीं स्थानेश्वराच्या राज्याला जोडावीं अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती अन् त्याच हेतूनें तो पुढें पुढें जात होता.

त्यानें त्या दिवशीं संध्याकाळीं एका राज्याची सीमा ओलांडली. हर्ष आपल्याशीं लढाई करण्यासाठीं आला आहे असें त्या राज्याच्या राजाला कळतांच तो हर्षाला भेटण्यासाठीं सामोरा आला नि त्याला हात जोडून म्हणाला, 'महाराज, मी आपल्याशीं तह करायला तयार आहें. आपल्या ज्या कांहीं अटी असतील, त्या मी अवश्य कबूल करीन !'

त्यावर हर्ष त्याला म्हणाला, 'आपण आमचें मांडलीकत्व स्वीकारायला तयार झालांत ही गोष्ट आनंदाची असली, तरी खंडणीदाखल आपल्याला प्रतिवर्षीं चार लाख स्वर्णमुद्रा आम्हांला द्याव्या लागतील ! आहे कबूल ?'

तो राजा खंडणी म्हणून हर्षाला प्रतिवर्षीं चार लाख स्वर्णमुद्रा द्यायला तयार झाला, म्हणून हर्षानें त्याच्याकडून लगेच तहनामा लिहून घेतला नि त्याचें राज्य त्याला परत केलें.

इतर राजांना जेव्हां ती हकीकत कळली, तेव्हां तेहि त्याला विनायुद्ध खंडणी द्यायला तयार झाले. अशा प्रकारें अनेक लहान-

मोठ्या राजांनीं हर्षवर्धनाचें मांडलीकत्व स्वीकारलें.

पण हर्ष तेवढ्यानें संतुष्ट झाला नाहीं. त्याला मोठमोठ्या नरेशांना जिंकायचें होतें ! त्यांना धूळ चारायची होती ! !

अन् त्यामुळें एकेक राज्य ओलांडतां ओलांडतां तो मालव राज्यांत घुसला. त्यानें मालव राज्याच्या सीमेवर आपल्या सैन्याची छावणी उभारली.

मालवनरेश फारच घमेंडखोर होता. हर्ष राजा आपलें सैन्य घेऊन मालव राज्यावर स्वारी करण्यासाठीं आला आहे असें त्याला कळतांच त्यानें मागचा पुढचा कांहींच विचार केला नाहीं. तो हर्षाशीं युद्ध करण्यासाठीं आपल्या सैन्यासह रणांगणावर जाऊन पोहोंचला.

उन्हाळ्याचे दिवस होते. जमिनींतून उष्ण वाफा बाहेर पडत होत्या. चारी बाजूंकडे भडकलेल्या आगीच्या ज्वाला दिसत होत्या अन् अशा अवस्थेंत दोन्ही बाजूंकडचे सैनिक तलवारबाजी करीत होते.

तथापि हर्षाची इच्छा निराळीच होती. जोंपर्यंत राजमहाल काबीज झाला नाहीं, तोंपर्यंत मालवनरेश पराजित झाला असें म्हणतां येणार नाहीं; त्यासाठीं आपण त्याच्या सैन्याची फळी फोडली पाहिजे नि राजमहालावर हल्ला चढविला पाहिजे असें त्याला वाटत होतें. आपला विचार अंमलांत आणण्यासाठीं त्यानें आपल्या सैन्याच्या दोन तुकड्या केल्या नि एकेक तुकडी योग्य सेनापतीच्या ताब्यांत दिल्यावर कांहीं सैनिक बरोबर घेऊन तो मालवगडाकडे निघून गेला.

मालवनरेशाचें नांव शशांक असें होतें. शशांक हा दुष्ट स्वभावाचा राजा होता. त्याच्या राज्यांतली प्रजा सुखी नव्हती. ती त्याच्या कारभाराला कंटाळली होती.

सम्राट हर्षवर्धन मालव राज्यावर चढाई करण्यासाठीं आला आहे असें त्या राज्यांतल्या लोकांना कळलें, तेव्हां त्यांना अतिशय आनंद झाला. ते हर्षाला कोणत्या प्रकारें मदत करतां येईल याचा विचार करूं लागले. सम्राट मालव राज्यांतल्या लोकांना मारपीट करीत मालवगडाच्या रोखानें पुढें चालला होता.

हर्षाचें सैन्य शहरांत घुसल्याचें शशांकाला कळलें, तेव्हां त्याला रोखण्यासाठीं तो आपल्या निवडक सैनिकांसह पुढें सरसावला.

दोन्ही पक्षांतील सैनिकांची शहराच्या एका भागांत गांठ पडली.

पहातां पहातां घनघोर युद्धाला सुरुवात झाली.

रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या.

घायाळ झालेले सैनिक तडफडत असल्याचें दिसूं लागलें.

अशा प्रकारच्या लढाईमुळें शशांक पराभूत होणें अशक्य आहे असें हर्षाला वाटलें, म्हणून त्यानें आपले कित्येक निवडक सैनिक शहराच्या पश्चिम द्वाराकडे पाठवून दिले नि कांहीं सैनिकांसह तो शहराच्या पूर्वद्वारावर हल्ला करूं लागला.

चोहोंकडे हाणामारी सुरू झाली. सैनिकांचे हाहा:कार आसमंतांत घुमूं लागले. हत्ती चित्कारूं लागले नि घोडे खिकाळूं लागले. कित्येक हत्तींच्या सोंडी तुटून खालीं पडल्या, तर कित्येक घोड्यांचे पाय तुटून जमिनीवर पडले. तिथलें सारें दृश्य भयानक दिसूं लागलें.

सम्राटानें हजारों शत्रुसैनिकांना जमिनीवर लोळविलें; पण तेवढ्यानें पुरें पडणार नाहीं असें त्याला वाटल्यामुळें हत्तींचा एक तांडा त्यानें पूर्व दरवाजाकडे पाठवून दिला. पलमवाला ठार

मारणारा हत्ती त्या तांड्याच्या अग्रभागीं होता !

त्या हत्तींनीं आपल्या गलेलठ्ठ सोंडी वळविल्या नि ते पूर्व दरवाजा फोडण्यासाठीं दरवाजाच्या दिशेनें धांवून गेले; तथापि किल्ल्याच्या तटावर शशांकाचे सैनिक उभे होते, त्यांनीं त्या तटावरून हत्तींवर बाणांचा वर्षाव केला. कित्येक सैनिक त्या हत्तींवर मोठमोठे दगडहि फेंकूं लागले आधुनिक काळांत स्वत:ला संभावित समजणारे गुंड घरांच्या छपरांवर दगड ठेवून ज्याप्रमाणें विरोधी पक्षांतील लोकांचीं टाळकीं सडकतात, त्याप्रमाणें प्राचीन काळीं शत्रुसैनिकांचा कपाळमोक्ष करण्यासाठीं किल्ल्यांच्या तटांवर मोठमोठे दगड रचून ठेवण्याची पद्धत होती. आधुनिक काळांतल्या चालत्या बोलत्या दगडांनीं आपल्या पूर्वजांची ही पुरोगामी (?) पद्धत चालू ठेवली आहे हें त्यांना भूषणास्पद आहे कीं दूषणास्पद आहे, हें त्यांचें त्यांनींच ठरवायचें आहे ! आम्हां साहित्यिकांचें तें काम नोहे !

किल्ल्याच्या तटावरून खालीं सोडण्यांत आलेले बाण नि फेंकण्यांत आलेले दगड हत्ती नि सैनिक यांच्यावर पडूं लागल्यामुळें ते फार व्याकुळ झाले; तथापि हत्ती नि सैनिक यांच्यापैकीं कुणीहि माघार घेईनासा झाला.

कांहीं वेळानें किल्ल्याचा दरवाजा खिळखिळा झाल्याचें दिसून आल्यामुळें सारे सैनिक उत्साहित झाले नि ते दुप्पट जोरानें दरवाजावर धडका मारूं लागले.

त्यावेळीं हत्तींनीं आपलें बळ इतकें वाढविलें कीं, तो प्रचंड दरवाजा खिळखिळा होऊन मोडला नि जमिनीवर पडला.

दरवाजा खालीं पडल्याचें पहातांच सारे सैनिक मोठ्यानें घोषणा करूं लागले, 'एकलिंग की जय ! ...सम्राट हर्षवर्धन की जय ! ...'

हर्षाच्या सैनिकांनीं किल्ल्याचें प्रवेशद्वार मोडलें असून, सारे सैनिक किल्ल्यांत घुसले आहेत असें शशांकाला कळतांच तो गडबडून गेला नि उरलेसुरले सैनिक सोबतीला घेऊन तो गडाकडे धांवला. असें असलें, तरी त्याचें धांवणें हें 'बैल गेला नि झोपा केला' या म्हणीसारखें होतें. त्याला धांवून कांहींच करतां येण्यासारखें नव्हतें. हर्षाचे सैनिक शशांकाच्या सैनिकांना मारून पिटून जमिनीवर लोळवीत होते.

हर्ष लढतां लढतां जिथें शशांकाचे सैनिक लढत होते, तिथें जाऊन पोहोंचला. तें पहातांच शशांकच्या सैनिकांनीं त्याला वेढलें. हर्ष संकटांत सांपडल्याचें दिसून आलें. हर्षाचे अंगरक्षक त्याचें रक्षण करीत होते नि पुढें येणाऱ्या शत्रुसैनिकांना ठार मारीत होते ही गोष्ट खरी असली, तरी कुठून कुणास ठाऊक, शत्रूचे सैनिक तिथें येऊन हर्षाला वेढा देत होते. त्याच्याभोंवतीं कोंडाळें करीत होते.



अचानक एका शत्रुसैनिकानें हर्षावर भाला फेंकला. त्या भाल्यामुळें हर्ष केव्हांच ठार झाला असता; तथापि त्यावेळीं त्याच्या सैन्यांतल्या एका सैनिकानें त्याचें रक्षण केलें. तो सैनिक चटकन पुढें झाला, त्यानें तो भाला झेलला अन् तोच भाला

आपल्या हातीं घेऊन तो शत्रुसैनिकांवर तुटून पडला. त्यांना ठार मारून त्यानें आपलें रणकौशल्य दाखवून दिलें नि त्यानंतर तो हर्षाला त्याच्या अश्वासह दुसऱ्या एका सुरक्षित ठिकाणीं घेऊन गेला.

त्या संरक्षक सैनिकाला पाहतांच हर्ष हर्षित झाला नि त्यानें त्याला त्याचें नांव विचारलें, तेव्हां त्या सैनिकानें आपलें नांव 'टीकम' असल्याचें त्याला सांगितलें.

हर्षानें वेळ न गमावतां टीकमाला सैन्यांतलें उच्च पद बहाल केलें. तो दोन हजार अश्वारोही सैनिकांचा अधिपति झाला.

तीन दिवस चाललेल्या लढाईंत हर्षानें शशांकाचा पराभव केला. त्यानें शशांकाला कैद केलें नि त्याच्यासह तो स्थानेश्वराला निघून गेला.

✦ ✦

# तीन

विजय संपादन करून नि शशांकसारख्या प्रबल शत्रूला कैद करून स्थानेश्वराला आणल्यानंतर हर्षानें स्थानेश्वर शहरांतल्या साऱ्या नागरिकांना दीपोत्सव साजरा करण्याची आज्ञा केली.

सारे नागरिक आनंदित झाले होते. राजाज्ञेप्रमाणें त्यांनीं त्या रात्रीं घरोघर पणत्या पेटवून दीपोत्सव साजरा केला. कित्येक नागरिकांनीं खेळतमाशे केले, तर कित्येकांनीं नाचगाणींहि केलीं. तात्पर्य' स्थानेश्वर शहरांत त्या रात्रीं प्रसन्नता पसरली होती. आनंदीआनंद गडे ! इकडे तिकडे चोहिंकडे ! अशी अवस्था झाली होती त्या रात्रीं.

दुसऱ्या दिवशीं सम्राटाचें दुसरें आज्ञापत्र निघालें, ' शहरांतल्या एकूण एक स्त्री-पुरुषांनीं आज दुपारीं शहरापासून नजीक असलेल्या दीपकुंडापाशीं जमायचें असून, तेथें निरनिराळ्या खेळांच्या स्पर्धा होणार आहेत. जो पुरुष किंवा जी स्त्री त्या खेळांत भाग घेईल अन् पहिल्या नि दुसऱ्या क्रमांकानें जिंकेल, त्या व्यक्तीला बक्षिसें दिलीं जातील ! '

दीपकुंड हें कोल्हापूरच्या खासबागेसारखें किंवा बेळगांवच्या मारुती माळासारखें मोठें मैदान होतें.

दुसऱ्या दिवशीं त्या मैदानांत डेरे–शामियाने उभारण्यांत आले अन् मल्लयुद्ध, कबड्डी, पशु–पक्ष्यांची लढाई इत्यादि खेळांची आयोजना करण्यांत आली. त्या काळीं मनोरंजनाचीं हींच साधनें होतीं. चित्रपट किंवा चित्रवाणी हीं नांवें तत्कालीन लोकांना मुळींच ठाऊक नव्हतीं. आधुनिक सुधारकां (!)च्या लेखीं त्या काळचे नागरिक कदाचित 'जांगळीमामा' हि असावेत. अस्तु. किं बहुना लेखनेन ?

ठरलेल्या वेळीं स्थानेश्वर शहरांतले नागरिक दीपकुंड मैदानांत जमले. कांहीं वेळानें सम्राट हर्षहि तिथें आला नि त्यानें खेळां–तमाशांना सुरवात करण्याविषयीं आज्ञा केली.

त्या मैदानांत एका ठिकाणीं कबड्डीचें आयोजन करण्यांत आलें होतें. जिथें तो खेळ चालला होता, त्या जागेच्या सभोंवार स्त्रिया, पुरुष नि मुलें हीं एकत्र गोलाकार उभीं राहिलीं होतीं. त्या काळीं पडदा पद्धत नव्हती, म्हणून बायका किंवा मुली पुरुषांच्या घोळक्यांत निःसंकोच उभ्या रहात असत. तत्कालीन स्त्रियांना किंवा मुलींना वाटेल तिथें हिंडण्या फिरण्याचें स्वातंत्र्य होतें. तत्कालीन आईबापांचा आपल्या मुलींवर पूर्ण विश्वास होता नि तत्कालीन मुलीहि सामाजिक नियमांचें उल्लंघन कधींच करीत नसत. त्यांचें चारित्र्य उज्ज्वल असे नि त्यामुळें कोणताहि पुरुष त्यांच्याकडे वांकड्या नजरेनें पहात नसे. त्याचप्रमाणें तत्कालीन पुरुष नि मुलगेहि चारित्र्यसंपन्न होते. ते आपापलें जीवन नियमा-संयमानें व्यतीत करत असत. 'शीलं परं भूषणम्' या तत्वाची त्यांना पूर्णतः जाणीव होती.

कबड्डी खेळाला सुरवात झाली.

दोन्ही दलें समोरासमोर उभीं होतीं.

त्या काळीं एकेका दलांत जास्तींत जास्त पन्नास पोरगे असत दुसऱ्याहि दलांत तेवढेच पोरगे असत; तथापि दोन्ही दलांतल्या खेळाडूंवर कोणत्याच प्रकारचें बंधन नसे. एका दलांतला खेळाडू हातांत बावटा घेऊन दुसऱ्या दलांत केव्हांहि जात असे. त्याला कुणाचीच आडकाठी नसे.

त्या दोन्ही दलांचीं निरनिराळीं नांवें होतीं. एका दलाचें 'सत्य दल' असें नांव होतें नि दुसऱ्या दलाचें 'तेज दल' असें नांव होतें. सत्य दलांत सैनिक होते नि तेज दलांत नागरिक होते. टीकम हा सत्य दलाचा नेता होता नि विरस हा तेज दलाचा नेता होता. विरस हा हर्षकालांतला नामांकित खेळाडू होता.

तो कबड्डीचा खेळ कांहीं वेळ मोठ्या धूमधडाक्यानें चालला अन् अखेर त्या खेळांत टीकमच्या सत्य दलाचा जय झाला.

त्याचप्रमाणें पशुपक्ष्यांचींहि युद्धें झालीं.

ज्या पक्षाचा पशु जिंकला, त्या पक्षाच्या लोकांनीं त्याला उचलून कुशींत घेतलें.

त्याचप्रमाणें ज्या पक्षाच्या पक्ष्यानें आपल्या प्रतिस्पर्ध्याला पराजित केलें, त्या पक्षाच्या लोकांनींहि त्या पक्ष्याची खूपच वाखाणणी केली. ते त्याला आपल्या कुशींत घेऊन मोकळ्या मैदानांत आनंदानें नाचूं गाऊं लागले.

दुपारपर्यंत सारे सामने संपले.

संध्याकाळीं सम्राट हर्षानें विजयी खेळाडूंना पुरस्कार वांटले.

इतकेंच नव्हे, तर त्या खेळाडूंबरोबरच त्यानें निर्धन नि कंगाल लोकांनाहि अन्नावस्त्रांचीं दानें दिलीं.

सारे लोक आपल्या सम्राटाची प्रशंसा करूं लागले.



त्या कार्यांतून मोकळा झाल्यावर हर्ष जेव्हां आपल्या महालांत जाऊन पोहोंचला, तेव्हां राणीवशांतल्या साऱ्या राजमहिषींनीं त्याला पंचारतींनीं ओवाळलें नि त्याचें आगतस्वागत केलें.

कुळस्त्रियांनीं त्याच्या गळ्यांत पुष्पहार घातले.

त्यानंतर हर्षानें टीकमला पुढें केलें नि तो त्यांना म्हणाला, 'हा शूर सैनिक माझ्यासोबत नसता, तर माझे पाय या महालाला पुन्हा लागलेच नसते. अन् त्यासाठीं याला कांहींतरी पुरस्कार देण्याची माझी इच्छा आहे !'

टीकमनें सम्राटाकडून झालेली आपली प्रशंसा ऐकल्यावर लीनपणानें आपली मान खालीं वांकविली.

सम्राटानें आपल्या गळ्यांतली मुक्तामाला काढली नि ती टीकमच्या गळ्यांत घातली.

टीकमनें सम्राटाला आदरपूर्वक अभिवादन केलें.

# चार

पलमवाला हर्षानें हत्तीकडून ठार मारविल्याची हकीकत टीकमकडून जेव्हां खेलाला कळली, तेव्हां ती प्रथम बेशुद्ध पडली नि कांहीं वेळानें सावध झाल्यावर ती आपल्याशींच कांहींतरी बडबडूं लागली. ती टीकमला पुन्हा पुन्हां आपल्या नवऱ्याविषयीं प्रश्न विचारीत होती अन् तशा स्थितींतच टीकमनें त्या दुःखी मायलेकींना नागवनांत नेलें होतें !

अखेर खेलानें कहर केला. कपाळ आपटून घेतां घेतां ती आपल्या प्राणाला मुकली ! त्या अनाथिनीचा जीवनदीप कायमचा निझून गेला ! !

बिचाऱ्या टिकोलीला असलेला आईबापांचा आधार नाहींसा झाला.

ती पोरकी पोर झाली.

टीकम टिकोलीला म्हणाला, 'टिकोली, तूं आतां नागवनांत एकटें रहाणें योग्य नाहीं. किंबहुना तें धोक्याचें आहे. तूं माझ्याबरोबर स्थानेश्वराला चल.'

पण टिकोली त्या गोष्टीला कबूल झाली नाहीं. ती आपल्या जातवाल्या लोकांना अतिशय भीत असे अन् त्यामुळें त्यांच्या अनुमतीशिवाय ती कुठेंहि जायला तयार नव्हती !

पण तितक्यांत तिला काय वाटलें कुणास ठाऊक; ती टीकमला म्हणाली, 'जर तुम्ही माझ्याशीं लग्न लावाल, तर मी तुमच्यासोबत येईन !'



आंधळा मागतो एक डोळा अन् देव देतो दोन अशी टीकमची अवस्था झाली. तिचें सांगणें ऐकतांच त्याला अतिशय आनंद झाला !

वेताळाला नव्हती बायको नि भावकादेवीला नव्हता नवरा अशीं त्या दोघांची स्थिति होती. त्या दोघांचेंहि परस्परांवर प्रेम होतें; पण त्यापूर्वीं तें सुप्तावस्थेंत होतें, आतां तें प्रकट झालें. असें असलें, तरी विघ्न आलें नाहीं तर तें लग्न कसलें ?

टीकमच्या पुढें एक अडचण येऊन उभी राहिली. आईबापांच्या सम्मतीशिवाय त्याला टिकोलीशीं लग्न लावतां येईनासें झालें !

त्यामुळें टीकम तिला म्हणाला, ' टिकोली, आज मी महाराजांसोबत रणांगणावर जाणार आहें. महाराजांनीं मला दोन हजार घोडेस्वारांचें सेनापतिपद वहाल केलें आहे. मी त्यांचा अंगरक्षकहि आहें. मी रणक्षेत्रावरून परत आल्यावर तुझ्याशीं अवश्य लग्न लावीन. लग्नाच्या बाबतींत माझे आईबाप अडथळा आणणार नाहींत याची मी तुला खात्री देतों. '

त्यावर टिकोली त्याला म्हणाली, ' मी तुमची वाट पहात राहीन. नागवनांत अब्रूनिशीं दिवस काढीन. जो कोण माझ्याकडे वांकड्या नजरेनें पाहील, त्याला मी सुऱ्यानें ठार मारीन ! '

टीकमनें तिला विचारलें, ' जर भोलननें तुझी कुरापत काढली, तर त्यावेळीं तूं काय करशील ? '

टिकोलीचा आत्मविश्वास जागृत झाला.

ती म्हणाली, ' त्यावेळीं कोणता उपाय योजायचा तें पक्कें ठाऊक आहे मला ! भोलनला माझें कांहींच वांकडें करतां येणार नाहीं. माझ्यामुळेंच त्याला नागवनांतून तोंड काळें करावें लागलें होतें, म्हणून तो आतां तसलें कांहींच करणार नाहीं ! '

टीकम आनंदित झाला नि स्थानेश्वराला निघून गेला.

तो आठवडाभर सम्राटाच्या सहवासांत होता. त्यानें आपल्या घोडेस्वारांसह युद्धांत दाखविलेला पराक्रम पाहून हर्ष खूष झाला नि त्यानें त्याला ' वर्मन ' ची उपाधि दिली; त्यामुळें राजकर्मचारी त्याला श्रीमान् टीकम असें संबोधूं लागले. त्याला राजमहालांतहि जाण्यायेण्याची परवानगी मिळाली. त्यावेळीं त्याचें वय एकवीस वर्षांचें होतें. त्यानें आपल्या छोट्याशा आयुष्यांत मोठ्यांत मोठा अधिकार प्राप्त केला होता, म्हणून कांहीं राजकर्मचाऱ्यांना आनंद झाला होता, तर कांहीं राजकर्मचारी त्याचा द्वेषहि करूं लागले होते; तथापि तो स्वतः शूर होता नि सम्रा-

टाचीहि त्याच्यावर कृपादृष्टि होती, म्हणून कुणालाहि त्याचें वाईट करतां येत नव्हतें !

एक दिवशीं टीकम आपल्या आईला म्हणाला, 'आई, कांहीं दिवसांपूर्वीं मी तुला जी एका इसमाची करुणकथा सांगितली होती, त्याला पंधरासोळा वर्षांची एक मुलगी आहे. तिला आईबाप नाहींत. तिच्या बापाला सम्राटांनीं हत्तीकडून ठार मारविल्याचें कळतांच तिच्या आईनेंहि आपलें कपाळ आपटून जीव दिला ! अशा स्थितींत ती पोरकी पोर नागवनांत एकटीच रहात आहे. त्या मुलीचें नांव टिकोली असें असून ती अतिशय देखणी आहे. तिच्याशीं लग्न लावावें असें मला वाटतें. जर तूं मला परवानगी देत असशील, तर मी नागवनांत जातों नि तिला इथें घेऊन येतों.'

त्यावर टीकमची आई म्हणाली, 'घरांत एक सुस्वरूप सून आणावी अशी माझीहि इच्छा आहे अन् टिकोली जर तशी असेल तर माझी मुळींच ना नाहीं !'

चोहोंकडे सुंदर फुलें फुललीं आहेत असें टीकमला वाटलें !

तो म्हणाला, 'तर मग मी तिला इथें घेऊन येऊं का?'

टीकमची आई म्हणाली, 'उतावळ्या नवऱ्याप्रमाणें गुडघ्याला बाशिंग बांधूं नकोस ! थोडा धीर धर ! जर तुझे वडील कबूल झाले, तर आपण तिघेंहि रथांतून नागवनांत जाऊं नि तिला मोठ्या थाटामाटानें इथें घेऊन येऊं !'

त्यावर टीकमानें हंसत हंसत आपल्या आईला विचारलें, 'अन् ती जर तुला कुरूप दिसली, तर तूं काय करशील ?'

टीकमची आई म्हणाली, 'तर आपण कांहीं न बोलतां इथें परत येऊं.'

टीकम म्हणाला, 'ठीक आहे. तसेंच करूं आपण !'

टीकमच्या आईनें आपल्या नवऱ्याला सारी हकीकत सांगितली. तिचा नवरा त्या गोष्टीला कबूल झाला.

दुसऱ्या दिवशीं टीकम आपल्या आईबापांसह एका सुसज्जित सुंदर रथांत बसला नि तो नागवनांत जाण्यासाठीं निघाला. प्रवासांत त्याला अनेक अडथळे आले; पण त्यानें त्यांची पर्वा केली नाहीं. तीन दिवसांच्या प्रवासानंतर तो नागवनांत जाऊन पोहोंचला.

टिकोली त्याला तिच्या झोंपडींतच भेटली. ती त्यावेळीं संध्यासमयींची पूजाअर्चा करीत होती.

टीकमच्या आईबापांनीं तिला पाहिलें, तेव्हां तीं दोघेंहि चकित झालीं. टिकोली त्यांना देवकन्येसारखी सुंदर दिसली. तिचे डोळे पाणीदार होते नि तिचा चेहरा चंद्रासारखा होता !

किमिंदुः किं पद्मं किम्मुकुरबिंबं किम् मुखं ।
किमाब्जे किं मीनौ किम् मदनबाणौ किम् दृशम् ।
खगौ वा गुच्छौ वा कनककलशौ वा किम् कुचौ ।
तडिद्वा तारा वा कनकलतिका वा किमबला ! ॥

अशी त्या दोघांचीहि भांबावल्यासारखी स्थिति झाली. तीं दोघेंहि संभ्रमांत पडलीं.

टिकोली त्या दोघांनाहि पसंत पडली ! तीं त्या वनबालेला आपली सून करून घ्यायला तयार झालीं नि नंतर तीं तिच्यासह रथांत बसून स्थानेश्वराला जाण्यासाठीं निघालीं.

योग्य वेळीं तीं स्थानेश्वराला जाऊन पोहोंचलीं.

सम्राट हर्षानें टीकमला रहाण्यासाठीं एक सुंदर भवन दिलें. टीकम टिकोलीसह त्या भवनांत राहूं लागला.

कोल जातीच्या पंचायतीनें टिकोलीला टीकमशीं लग्न लावण्याची परवानगी दिली होती; तथापि ती गोष्ट भोलनला

आवडली नाहीं. टिकोली नागवनांतून निघाली, तेव्हां तो तिला म्हणाला, ' मी केव्हां ना केव्हां तरी टीकमचा चांगलाच समाचार घेईन हें लक्षांत ठेव ! '

त्यावर टीकमनें त्याला सांगितलें, ' मी तुझ्यासारखीं पोरें खूप पाहिलीं आहेत. तुझ्यासारख्या टग्यांना धडा कसा शिकवावा तें मला माहीत आहे ! '

टीकमचा बाप अटक वर्मा यानें आठवड्याच्या आंत लग्नाची तयारी केली.

एका सुमुहूर्तावर टिकोलीचें टीकमशीं लग्न लावायचें ठरलें.

जिकडे तिकडे निमंत्रणपात्रिका पाठावण्यात आल्या.

ठरलेल्या दिवशीं नागवनांतले लोक त्या लग्नाला आले.

सम्राट हर्षवर्धनहि लग्नमंडपांत आला. पुरोहितांनीं अंतरपाट धरल्यावर हर्षानें वधूवरांना उद्देशून—

ददातु भगवान् भाग्यं पुत्र पौत्रादि संपदम् ।
टीकमाय सुपुत्राय कुलदेवः स मे प्रभुः ।।
ददातु नित्यं सौभाग्यं धनधान्यादि वैभवम् ।
टिकोलीयै च कन्यायै कुलदेवः स मे प्रभुः ।।

असा शुभाशीर्वाद दिला !

टिकोलीचें टीकमाशीं लग्न लागल्यावर ती आपल्या सासरीं एखाद्या पांखरासारखी किलबिल करूं लागली ! ती आपल्या आईबापांचें वियोगदुःख अल्पावधींतच विसरून गेली.

✦ ✦

# पांच

टिकोली अविवाहित असल्यावेळीं घरांतलीं कामें स्वतःच करीत होती; पण ती लग्नानंतर सासरीं आल्यावरहि घरांतलीं कामें स्वतःच करूं लागली. टीकमनें तिच्या साह्यासाठीं सेविका ठेवल्या होत्या; तथापि टिकोली घरांतली बहुतेक कामें स्वतःच करीत असे. ती सेविकांवर विसंबून रहात नसे !

तिची वागणूक पाहिल्यावर तिच्या सासूसासऱ्यांचें तिच्या-वर प्रेम बसलें. तीं तिला तळहातावरच्या फोडाप्रमाणें वागवूं लागलीं. हळू हळू तिला नागवनांतल्या साऱ्या गोष्टींचा विसर पडला. कुटुंबांतील माणसांशीं मिळून मिसळून वागावें असें तिला वाटूं लागलें.

अशा रीतीनें कांहीं दिवस पार पडले. हळू हळू वर्षहि संपण्याच्या बेतांत आलें.

एक दिवशीं यमुनेच्या कांठीं सोमवती अमावास्येचा मेळावा भरला. तसा मेळावा दर पांच वर्षांनीं भरत असे. त्या मेळाव्याला

साधुसंत, जपीतपी, संन्यासी–बैरागी, यांशिवाय दूरदूरचे यात्रेकरीहि येत असत अन् यमुनेंत स्नान केल्यावर आपापल्या गांवीं परत जात असत.

त्या मेळाव्याला सकाळीं उजाडल्यापासूनच माणसांची रीघ लागत असे.

एक दिवशीं टीकम टिकोलीला म्हणाला, 'टिक्को, यमुनातीरावर आज अनेक साधुसंत जमले आहेत. चीन देशांतून ह्यूएनशांग नांवाचा एक प्रवासी आला असून तोहि आज या मेळाव्याला येणार असें ऐकलें आहे मी. तो प्रवासी गौतम बुद्धाचा उपासक असून बौद्ध धर्माचें ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं भारतांत आला आहे म्हणे. मेळाव्यांत त्याचें भाषणहि होणार आहे. सम्राट हर्षवर्धन आज बौद्ध धर्माची दीक्षा घेणार आहेत असेंहि समजतें. आपण दोघें जाऊंया का मेळावा पहायला ?'

टिकोली म्हणाली, 'आयती चालून आलेली सुवर्णसंधि सोडण्याइतकी मी करंटी नाही कांहीं. आपण अवश्य जाऊं !'

टीकम म्हणाला, 'ठीक आहे. आज संध्याकाळीं जाऊं आपण.'

यमुनेच्या कांठीं असलेल्या एका मोठ्या मैदानांत उत्सवाचा कार्यक्रम व्हावयाचा होता.

मैदानाच्या चारी बाजूंना स्त्रिया, पुरुष नि मुलें दिसत होतीं. सारे यात्रेकरू मोठ्या थाटांत नि नटूनथटून आले होते. ते आनंदी दिसत होते. बोलून चालून जत्राच ती ! तिथें आनंदच दिसायचा ! जत्रेंत दुःखाला वाव नसतो मुळी !

एका मोठ्या मंडपांत हर्षाच्या बसण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. एका उंच रंगमंचावर सोन्याचें सिंहासन ठेवण्यांत आलें होतें नि त्याच्यापुढें एक मेज ठेवण्यांत आलें होतें.

त्या मेजासमोरच्या मोकळ्या मैदानांत खेळ, तमाशे दाखविणारे लोक आपापल्या तयारींत उभे होते. आमोदप्रमोदाचीं सारीं साधनें तिथें तयार ठेवण्यांत आलीं होतीं.

टीकम नि टिकोली हीं दोघेंहि तिथें आलीं. तीं दोघेंहि घोड्यांवर स्वार होऊन आलीं होतीं. त्या दोघांसोबत कांहीं सेवकहि होते.

त्या दोघांनीं आपापले घोडे सेवकांच्या स्वाधीन केले नि तीं मंडपांत शिरलीं. आंत जातांना त्यांनीं आपल्या हातांत धनुष्य नि बाण हीं घेतलीं होतीं.

टिकोलीनें शुभ्र वस्त्रें परिधान केलीं होती नि टीकमनें आपल्या अंगांत केशरी रंगाचा अंगरखा घातला होता. अंगरख्याखेरोज त्याच्या गळ्याभोंवतीं उत्तरीय (उपरणें) हि होतें.

टिकोलीनें व्यवस्थित साजशृंगार केल्यामुळें तिचें मूळचें सौंदर्य अधिकच खुलून दिसत होतें !

थोड्या वेळानें भगवान् बुद्धाच्या आरतीला सुरवात झाली. सोन्याच्या तबकांत चांदीचीं पेटतीं निरांजनें ठेवण्यांत आलीं होतीं नि मोठ्या तालासुरांत आरती गायिली जात होती; पण ती संपण्यापूर्वींच मंडपांतलीं माणसें इकडे तिकडे पळत सुटलीं !

सारे लोक भयभीत होऊन हलकल्लोळ करीत होते ! काय घडलें तेंहि कुणाला नीटपणें सांगतां येत नव्हतें फक्त मंडपांतून एक पळाला म्हणून त्याच्यामागून दुसरा पळत होता ! जणुं तीं माणसें नसून धनगराचीं मेंढरेंच होतीं !

तितक्यांत कुणीतरी एक म्हणाला, 'लुटारू लोकांची टोळी आली असून त्या टोळींतले लोक मैदानांतल्या माणसांवर बाणांचा वर्षाव करीत आहेत !'

टीकमनें त्याचें तें बोलणें ऐकलें मात्र, तो टिकोलीसह बसल्या जागेवरून उठला नि आपल्या सेवकांसह मंडपांतून बाहेर पडला !

त्यानें बाहेर पडल्यावर पाहिलें, तेव्हां मंडपाच्या पूर्वेकडील दरवाजाशीं कांहीं घोडेस्वारांची हाणामारी चाललेली असून, त्यामुळें मंडपांत गडबड सुरू झाली आहे असें त्याला दिसून आलें.

सम्राटाचे सैनिक लुटारू लोकांशीं तलवारींनीं लढत होते; तथापि लढतां लढतां ते माघार घेत होते नि लुटारू लोक पुढें येत होते !

तो प्रकार पाहिल्यावर टीकम टिकोलीला म्हणाला, 'सम्राटांचे सैनिक थोडे असावेत असें वाटतें; त्यासाठीं तूं तुझा घोडा माझ्या घोड्याच्या मागें ने. मी त्या लुटारू लोकांवर बाणांचा वर्षाव करून त्यांना पळवून लावतों !'

टिकोलीनें आपला घोडा टीकमच्या घोड्यामागें नेला. टीकमनें आपल्या सेवकांना लुटारू लोकांवर बाणांचा वर्षाव करण्याचा आदेश दिला नि तो स्वत:हि त्यांच्यावर बाण सोडूं लागला.

टीकम इतक्या कौशल्यानें बाण सोडीत होता कीं, त्याचा एकहि नेम चुकत नव्हता. इतकेंच नव्हे, तर एका बाणांत तो कित्येक लुटारूंचा निकाल लावीत होता !

टीकम ज्या उंचवट्यावर उभा राहून बाणांचा मारा करीत होता, त्या उंचवट्याच्या आजूबाजूला वरींचशीं लहानमोठीं झाडें होतीं. टीकमला आपल्या शौर्याचें प्रदर्शन करावयाचें नव्हतें, म्हणून त्यानें आपला घोडा एका मोठ्या वृक्षाच्या आडोशाला उभा केला नि तो तिथून बाण सोडूं लागला !

हा वेळपावेतों टिकोली त्या उंचवट्याच्या आडोशाला उभी होती; पण टीकम दूरवरच्या एका झाडाआड जाऊन बाण

सोडीत असल्याचें पाहिल्यावर तिनेंहि आपला घोडा तिथें नेला नि तिथून ती लुटारू लोकांवर बाणांचा वर्षाव करूं लागली !



तितक्यांत टीकमला एक ओझरत्या ओळखीचा माणूस दिसला, तेव्हां तो टिकोलीला म्हणाला, 'तो पहा ! कोण आहे तो ?'

टिकोलीनें त्याच्याकडे न्याहाळून पाहिलें नि ती आपल्या नवऱ्याला म्हणाली, 'अहो, तो भोलन आहे !'

त्यावर टीकम म्हणाला, 'तो लुटारू लोकांचा पुढारी असून आम्ही इथें आलों असल्याचें त्याला कळल्यावरून आम्हांला मारण्यासाठीं तो इथें आला असावा असें मला वाटतें !'

टिकोली म्हणाली, 'मलाहि तसेंच वाटतें !'

टीकम म्हणाला, 'तूं काळजी करूं नकोस ! सम्राटांचे राखीव सैनिक इथें येण्यापूर्वींच मी या लुटारू लोकांना इथून पळवून लावतों पहा !'

असें म्हणून त्यानें आपला घोडा मंडपाकडे नेला. टिकोलीहि त्याच्यामागून गेली.

✦ ✦

## सहा

टीकम मंडपापाशीं जाऊन पोहोंचतो न पोहोंचतो, इतक्यांत सम्राटाचे राखीव सैनिक तिथें येऊन दाखल झाले. टीकमला त्यांची योग्य वेळीं मदत मिळाली !

टीकमनें त्या सैनिकांच्या निरनिराळ्या तुकड्या बनविल्या नि त्या ठिकठिकाणीं पाठवून दिल्या. त्यानें एका तुकडींतील सैनिक आपल्या हाताखालीं घेतले नि तो त्यांच्यासह ज्या जागीं भोलन उभा होता, तिकडे निघून गेला !

सैनिकांची संख्या आपल्याहून जास्त असल्याचें पाहिल्यावर लुटारू लोकांपैकीं कित्येकांनीं पळ काढला नि कित्येक जागच्या जागींच उभे राहिले !

सम्राटाच्या सैनिकांनीं त्यांच्यांतील कित्येकांना पकडलें नि कित्येकांना तिथल्या तिथेंच ठार केलें !

कांहीं वेळानें त्या मैदानांत पूर्ववत् शांतता पसरली !

टीकम मागें परतून आल्यावर सैनिकांनीं त्याला प्रणाम केला.

त्यानें सैनिकांना शिबिरांत जाण्याची आज्ञा केली नि टिकोलीकडे वळून पाहिलें. घोड्यावर स्वार झालेली टिकोली टीकमकडे आश्चर्यानें पहात होती. टीकमच्या दोन्ही खांद्यांवर बाणांच्या दोन जखमा झाल्या होत्या नि त्या जखमांतून भळभळां रक्त वहात होतें ! असें असलें, तरी टीकमला त्याची मुळींच काळजी वाटत नव्हती !

टिकोली आपल्या नवऱ्याला म्हणाली, 'तुमच्या दोन्ही खांद्यांना बाणांच्या जखमा झाल्या असल्यानें तुम्ही आतां घरीं चला. तिथें गेल्यावर मी औषधउपाय करीन कांहींतरी.'

त्यावर टीकम तिला म्हणाला, 'टिक्को, मी आतांपर्यंत असल्या जखमांना कधींच भ्यालों नाहीं; मग आतां थोडाच भ्यायला बसलों आहें ? चल, आपण त्या मेळाव्याची मजा लुटूंया थोडीशी !'

टिकोली म्हणाली, 'तुम्ही किती विक्षिप्त आहांत हो ? युद्ध करतां करतां थकून भागून गेलांत अन् आतां मेळाव्याची मजा लुटूं पहातांहांत ! मी नाहीं येत तुमच्यासोबत मजा मारायला !'

टीकम कांहींच बोलला नाहीं. तो तिच्या घोड्याबरोबर आपला घोडा चालवूं लागला !

कांहीं अंतर तोडल्यावर टीकम टिकोलीला म्हणाला, 'टिक्को, चल आपण यमुनेच्या कांठीं फिरायला जाऊं. अस्तमानाला अजून अवकाश आहे !'

टिकोली म्हणाली, 'ठीक आहे. जरा पाय मोकळे करूं !'

घोड्यांवर स्वार झालेलीं तीं दोघेंहि आपापसांत बोलतां बोलतां यमुनेच्या घाटावर जाऊन पोहोंचलीं. त्यांनीं आपापले घोडे चरण्यासाठीं हिरवळीवर सोडून दिले नि तीं दोघेंहि यमुनेच्या पात्रांत उतरलीं !

यमुनेचें तें स्फटिकासारखें स्वच्छ पाणी पाहतांच टिकोलीला स्नान करावेंसें वाटलें.

ती टीकमला म्हणाली, 'इथें बराच वेळ जलक्रीडा करावी असें मला वाटतें.'

टीकमनें तिचें म्हणणें मान्य केलें. दोघेंहि जलक्रीडा करूं लागलीं.

तितक्यांत लुटारू लोकांच्या टोळीचा पुढारी बनलेला भोलन आपल्या दोघांतिघां साथीदारांसह तिथें आला नि एका उंचवटयावर बसला. टीकम नि टिकोली हीं दोघें जलक्रीडा करीत असल्याचें पाहिल्यावर त्याला आसुरी आनंद झाला. टीकमनें त्याच्या साथीदारांना नुकतेंच ठार मारलें होतें, त्याचा बदला आपल्याला आतां घेतां येईल असें त्याला वाटलें.

वास्तविक खरा प्रकार निराळाच होता. भोलनला टिकोलीशीं लग्न लावायचें होतें; पण टीकम तिच्याशीं लग्न लावूं इच्छीत असल्याचें पाहिल्यावर तो आपला शत्रु आहे असें भोलनला वाटलें अन् तो टिकोली नि टीकम या दोघांचाहि पिच्छा पुरवूं लागला. अगदीं हात धुवून त्यांच्या पाठीं लागला.

अन् त्याच कारणानें त्यानें मैदानांत गोंधळ माजविला होता; पण अखेर अपेश आल्यानें त्याला आपला जीव वांचविण्यासाठीं तिथून पळून जाणें भाग पडलें होतें !

अन् भटकतां भटकतां तो तिथें जाऊन पोहोंचला होता.

भोलन मनांत म्हणाला, 'टिकोली ही कोल जातीची असतांहि तिनें माझ्या बाबतींत अन्याय केला असल्यानें माझ्या जिवांत जीव असेस्तोंवर मी तिचा पिच्छा पुरवल्याशिवाय रहाणार नाहीं ! अन् ती वळलीच तर मी तिच्याशीं अवश्य लग्न लावीन !'

असा विचार करतां करतां भोलन तिच्याकडे आसुसलेल्या नजरेनें पाहूं लागला.

त्यावेळी टिकोली यमुनेच्या निर्मल जलांत टीकमसह इकडे तिकडे वागडत होती. अगदीं वारा प्यालेल्या वासरासारखी ! तिचें तें वागडणें अतिशय मोहक वाटत होतें.



टीकम तिच्या अंगावर हाताच्या पंजांनीं पाणी उडवीत होता. तीं दोघेंहि मनांतून हरखून गेलीं होतीं; तथापि भोलन मात्र त्या दोघांच्याहि नांवानें मनांतल्या मनांत जळफळत होता नि त्याच वेळीं दुसरी कोणतीतरी योजना आंखीत होता.

पण तितक्यांत त्याच्या मनांत काय आलें कुणास ठाऊक, तो आपल्या तिघांहि साथीदारांसह नदीच्या पात्रांत उतरला !

टीकमनें त्याच्याकडे लक्षच दिलें नाहीं; तथापि त्याला पाहिल्यावर टिकोली मात्र मनांतल्या मनांत घाबरून गेली. तो आपली कुरापत काढल्याशिवाय रहाणार नाहीं असें तिला वाटलें.

भोलन टीकमला म्हणाला, 'टीकम, तूं टिकोलीशीं लग्न लावून मोकळा झालास, पण तुझें हें कृत्य अनुचित आहे !'

टीकम कठोर स्वरांत उत्तरला, 'माझें तें कृत्य अनुचित

असो अथवा उचित असो, त्याचें फळ मला भोगावें लागेल; पण तुला त्याची काळजी करण्याचें कारण काय ?'

भोलन दांत विचकून म्हणाला, 'मला काळजी करण्याचें कांहींच कारण नाहीं ही गोष्ट विसरून जा ! टिकोलीचें माझ्याशीं लग्न ठरलें होतें; पण तूं मध्यें आडवा आलास नि तिला घेऊन फरारी झालास, त्याचा सूड घेतल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाहीं हें तूं लक्षांत ठेव !'

त्याचें तें आचरटपणाचें बोलणें ऐकतांच टीकम खदखदां हंसला नि त्याला म्हणाला, 'भोलन, तुझा पोरकटपणा अजून गेला नाहीं. तूं किती नादान आहेस तें आज कळलें मला ! आज-पासून टिकोलीला तूं तुझी बहीण समज. इतकेंच नव्हे, तर नागवनांतल्या सार्‍या मुली तुझ्या बहिणीच आहेत असें मान नि त्यांच्याशीं चांगल्या प्रकारें वाग !'

त्यावर भोलन म्हणाला, 'मी यावेळीं थकून गेलों असल्यानें कांहींच बोलत नाहीं; तथापि मला संधि सांपडतांच तुझ्या अंगांत किती पाणी आहे तें मी पाहीनच पाहीन !'

टीकम म्हणाला, 'धन्यवाद !'

भोलन रागानें तिथून निघून गेला. टीकमहि न्हाल्या-धुतल्यावर नदीकांठीं आला नि तो टिकोलीसह आपल्या घरीं निघून गेला.

✦ ✦

## सात

सम्राट हर्षवर्धनानें त्रिवेणीच्या तीरावर दर पांच वर्षांनंतर एक धर्मसंमेलन भरविण्याचा पायंडा पडला होता. त्रिवेणीचा तीर हा अति पवित्र असल्यानें त्या संमेलनांत सहभागी होणाऱ्या माणसांच्या मनांत सद्‌विचार निर्माण होत असतात अशी हर्षाची कल्पना होती.

खरे सांगायचें म्हणजे त्या संमेलनाला राष्ट्रीय संमेलनाचें स्वरूप प्राप्त करून देण्याची त्याची इच्छा होती. तो हयात असे-पर्यंत तशा प्रकारचीं पंचवर्षीय संमेलनें भरत असत; पण त्याच्या पश्चात् तीं भरेनातशीं झालीं !

संमेलन मोठ्या थाटामाटांत पार पडावें या हेतूनें सम्राट हर्षवर्धनानें आपल्या राजकोषांतला बहुतेक सारा पैसा खर्च केला होता, म्हणून वाहेरचे बरेचसे लोक त्या संमेलनाला मोठ्या आदरानें नि आनंदानें आले होते.

बौद्ध धर्माची जाणीव करून घेण्यासाठीं लोकांनीं एकत्र

यावें हा धर्मसंमेलनाचा मुख्य हेतु होता, म्हणून हर्षानें बौद्ध विद्वानांना बोलाविलें होतें नि या समेलनांत त्यांचीं व्याख्यानें घडवून आणलीं होतीं.

त्यामुळें या धर्मसंमेलनाला बरीचशी प्रसिद्धी मिळाली होती.

त्यापूर्वीं यमुनातीरावरहि तशाच प्रकारचें सम्मेलन भरलें होतें, त्या सम्मेलनाला टीकम नि टिकोली हीं गेलीं असल्याचें वाचकांना ठाऊकच आहे; पण भोलन लुटारूनें त्या सम्मेलनाचा विचका करून टाकला होता. त्यानें सारें सम्मेलन उध्वस्त करून टाकलें होतें.

सम्राटाला ती गोष्ट कळतांच त्यानें आपल्या अंगरक्षकाला– टीकम वर्मनला– बोलावणें पाठविलें नि तो आल्यावर त्यानें त्याला सम्मेलन अचानक उधळलें जाण्याचें कारण विचारलें.

टीकम म्हणाला, 'महाराज, भोलन नांवाच्या एका आड-मुठ्या तरुणाला माझ्या पत्नीशीं लग्न लावायचें होतें; तथापि नागवनांतल्या पंचांनीं त्याला परवानगी दिली नाही, म्हणून तो मला आपला वैरी समजतो नि मी जिथें जिथें जातों, तिथें तिथें मला त्रास देण्यासाठीं तो आपल्या साथीदारांसह येत असतो! त्या दुष्टानें त्या दिवशींहि तसेंच केलें; पण मी माझ्या सैनिकांसह त्याच्याशीं सामना केला. स्थानेश्वराहूनहि राखीव सैनिकांना बोलावून आणलें. आतां आपला निभाव लागणें अशक्य आहे असें जेव्हां त्याला दिसून आलें, तेव्हां आपला जीव वांचविण्यासाठीं तो पळून गेला!'

टीकमकडून सारी हकीकत ऐकून घेतल्यावर हर्षाला आनंद झाला.

त्यानें टीकमला सांगितलें, 'उद्यां धर्मसम्मेलन भरावयाचें असून त्या सम्मेलनाला साऱ्या लोकांनीं मोठ्या उत्साहानें उपस्थित

रहावें, त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था करण्यांत आली आहे, अशी साऱ्या स्थानेश्वर नगरांत घोषणा करवा.'

'आज्ञा महाराज!' असें म्हणून पुढील व्यवस्था करण्यासाठीं टीकम तिथून निघून गेला.

कांहीं वेळानें तो परत आला नि हर्षाला म्हणाला, 'महाराज, उद्यांच्या धर्मसम्मेलनाचा प्रचार करण्यासाठीं मीं आठदहा इसमांना शहरांत ठिकठिकाणीं पाठवून दिलें आहे.'

'ठीक आहे!' असें म्हणून त्या सम्मेलनासंबंधींच्या इतर गोष्टी दरबारी लोकांकडे बोलण्यासाठीं हर्ष तिथून निघून गेला.

त्याच्या आज्ञेनुसार दरबारी लोकांनीं सैन्यांतले निवडक सैनिक संरक्षणासाठीं ठिकठिकाणीं उभे केले. जिथें अधिक धोका होता, तिथें चौक्यापहारे वसविण्यांत आले.

हर्षाच्या मनांत आस्ते आस्ते बौद्ध धर्माविषयीं आस्था निर्माण होऊं लागली होती. त्याच्या अंतःकरणांत अहिंसेची भावना वाढूं लागली होती.

दुसऱ्या दिवशीं त्रिवेणीच्या तीरावर माणसांचा मेळावा दिसूं लागला. तो मेळावा पूर्वींच्या मेळाव्यापेक्षां मोठा होता. त्याच्यांत स्त्रिया, पुरुष नि मुलेंहि दिसत होतीं.

सारे सैनिक मोठ्या सावधगिरीनें सम्मेलनाची देखभाल करीत होते; त्यामुळें सम्मेलनांतलीं सारीं माणसें निश्चिंत असल्याचें दिसत होतें.

दूरदूरचे बौद्ध भिक्षूहि त्या सम्मेलनाला आले होते. जवळजवळ दहा हजार भिक्षु दिसत होते तिथें.

मैदानाच्या मध्यभागीं सम्राटाला बसण्यासाठीं मोठा मंडप उभारण्यांत आला होता. त्या मंडपांत दूरदूरचे राजेमहाराजे मोठ्या रुबाबांत बसले होते.

तो मंडप चारी बाजूंनीं सजविण्यांत आला होता. हवेंत सुगंध पसरावा म्हणून सैनिक त्या मंडपांत वाळ्याचें पाणी शिंपडीत होते !

खेड्यापाड्यांतल्या लोकांनीं तशाप्रकारची सजावट पूर्वी कधींच पाहिली नव्हती, म्हणून ते आश्चर्यचकित झाले होते; इतकेंच नव्हे, तर आपण मृत्युलोकांतून स्वर्गलोकांत येऊन बसलों आहोंत असेंहि कित्येकांना वाटत होतें.

कांहीं वेळानें हर्षवर्धन त्या मंडपांत आला नि आपल्या आसनावर बसला.

त्याचें आगमन होतांच 'महाराजाधिराज हर्षवर्धन की जय !' असा साऱ्या लोकांनीं उच्च स्वरांत जयजयकार केला !

त्यानंतर हर्षानें 'आतां धार्मिक कार्यक्रमाला सुरुवात होऊं द्या !' अशी आज्ञा केली.

त्याची आज्ञा होतांच कांहीं बौद्ध भिक्षु रंगमंचावर चढले नि बुद्धदेवाची समंत्रक पूजा करूं लागले. कांहीं वेळानें त्यांची पूजा आटोपल्यावर ते बुद्धदेवाची प्रार्थना करूं लागले, 'भगवान् बुद्धदेवा, आम्हाला सामर्थ्य दे ! आम्हाला बुद्धि दे ! आम्हाला सत्य बोलण्याची प्रेरणा दे ! आम्हाला धैर्यवान होण्याची हिम्मत दे ! आमच्याकडून अहिंसेच्या नियमांचें पालन होवो ! आमच्या मुखांतून गोड शब्द बाहेर पडोत ! आमच्याकडून कोणत्याहि प्राण्याचा घातपात न होवो !'

सम्मेलनांतल्या साऱ्या लोकांनीं बौद्ध भिक्षूंनीं उच्चारलेल्या वाक्यांचा पुनरुच्चार केला !

त्यानंतर हर्षानें साऱ्या बौद्ध भिक्षूंना दानादाखल एकेक स्वर्णमुद्रा दिली !

तत्कालीन राजेमहाराजे दानधर्मांत बराच पैसा खर्च करीत

असत, म्हणून हर्षानें आंधळे, पांगळे, अनाथ, अधन इत्यादि लोकांना दानें द्यायला सुरुवात केली.

अखेर त्यानें पांच वर्षांत संचित केलेलें सारें धन याचकांना वांटून टाकलें! दानें देण्याच्या बाबतींत त्यानें आपला हात सढळ सोडला होता. पुण्यश्लोक नलराजाहि तसाच दानशूर होता असें रघुनाथ पंडितांच्या नलदमयंती स्वयंवराख्यानांतल्या–

वाजींचें मन जाणता सकळहि राजी शिपाई जया।
याजी होउनियां द्विजांसि म्हणतो 'या जी धनें घ्यावया!'॥

या श्लोकार्धावरून दिसून येते! अस्तु.

दानविधिसमयीं त्याला मदत करण्यासाठीं त्याची बहीण राज्यश्री ही त्याच्यापाशीं बसली होती.


त्या बंधुभगिनींचे औदार्य पाहिल्यावर भिक्षुक नि याचक हे आनंदित झाले होते नि ते दान घेण्यासाठीं क्रमाक्रमानें त्यांच्या-कडे जात होते! वारुळांतून मुंग्या बाहेर पडाव्यात, त्याप्रमाणें ते याचक जमीन फोडून बाहेर आले असावेत असें पहाणाऱ्याला वाटत होतें!

आस्ते आस्ते दानांची सामुग्री संपत आली.

सम्राटापाशीं फक्त दोनच वस्त्रें उरलीं होतीं; पण बरेचसे याचक त्याच्यासमोर उभे होते

हर्ष मनांत विचार करूं लागला, 'आतां काय करायचें? राजकोषांतहि द्रव्य शिल्लक नाहीं; अशा अवस्थेंत या याचकांना दानें द्यायचीं तरी कशीं! हीं दोन वस्त्रें उरलीं आहेत; पण बौद्ध धर्माची दीक्षा घेतांना मला त्यांची गरज भासणार!'

विचार करतां करतां त्याला काय वाटलें कोण जाणे; त्यानें तीं दोन्ही वस्त्रें उचललीं नि तो तीं समोर उभ्या असलेल्या याचकांना देऊं लागला, तोंच राज्यश्रीनें त्याच्या हाताला धरलें नि तिनें त्याला विचारलें, 'हें तूं काय करतो आहेस भाई ?'



हर्षानें उत्तर दिलें, 'दान देतों आहें ताई !'

त्यावर राज्यश्री त्याला म्हणाली, 'पण बौद्ध धर्माची दीक्षा घेतांना तीं दोन्ही वस्त्रें वापरावीं लागणार तुला !'

हर्षानें तिला विचारलें, 'तर मग माझ्याकडे दान मागण्यासाठीं आलेल्या या याचकांना मी रिक्तहस्तें पाठवूं का ?'

राज्यश्री म्हणाली, 'काय करणार ? त्यांना परत पाठवावें लागेल !'

असें म्हणून ती त्याच्या चेहऱ्याकडे न्याहाळून पाहूं लागली

हर्ष म्हणाला, 'हीं दोन्ही वस्त्रें दान दिलीं जावींत अशी माझी आज्ञा आहे ! जे याचक उरले आहेत, त्यांच्यासाठीं राज-

नगरांतल्या कोषांतलें द्रव्य मागविलें जाईल; पण कोणीहि याचक रिक्तहस्तें जातां कामा नये अशी माझी इच्छा आहे!'

हर्षाचें तें बोलणें ऐकतांच मंडपांत वसलेल्या साऱ्या दर्शकांच्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले. ते लोक हर्षाची वाखाणणी करूं लागले. तशा प्रकारचा दानशूर राजा त्यांनीं पूर्वी कधींच पाहिला नव्हता!

तितक्यांत त्याच्या राज्यांतला एक मोठा सावकार एका बालकासह त्याच्यासमोर येऊन उभा राहिला नि त्याला नम्रपणें म्हणाला, 'महाराजाधिराज, माझ्या हातून फार मोठा गुन्हा घडला आहे नि त्या बावतींत आपण मला क्षमा करावी अशी आपल्याला माझी विनंति आहे!'

त्या सावकाराचें तें बोलणें ऐकतांच मंडपांतले सारे दर्शक आश्चर्यचकित होऊन त्याच्याकडे पाहूं लागले.

त्याचें संदिग्ध बोलणें ऐकल्यावर हर्षहि बुचकळ्यांत पडला नि त्यानें त्या सावकाराला विचारलें, 'तुम्ही उत्तरापथाचे प्रसिद्ध व्यापारी आहांत हें मला माहीत आहे; पण तुमच्या हातून फार मोठा असा कोणता अपराध घडला?'

वणिक म्हणाला, 'काल मी त्रिवेणी नदींत स्नान करून बाहेर आल्यावर या बालकाचा रोदनस्वर माझ्या कानीं पडला. अन्नदाते, मी याला उचलून माझ्या घरीं नेलें. घरीं गेल्यावर पाहिलें तेव्हां याच्या गळ्यांत असलेला हा रत्नहार मला दिसला; म्हणून त्या रत्नहारासह त्या बालकाला मी आपल्यासमोर आणलें आहे नि हा सालंकृत बालक मी आपल्याला प्रेमोपायन म्हणून

अर्पण करीत आहें. आपण याचा स्वीकार करावा अशी आपल्याला विनंति आहे !'

हर्षानें त्या बालकाकडे प्रेमळ नजरेनें पाहिलें नि तो त्या व्यापाऱ्याला म्हणाला, 'वणिकमहोदय, तुमची नेक नियत पाहून मला आनंद झाला; म्हणून या दोन्ही वस्तु मी तुम्हांला दान देत आहें. इतकेंच नव्हे, तर तुम्हांला आजपासून 'सभापति' ही पदवीहि दिली जात आहे !'

✦ ✦

# आठ

सम्राट हर्षवर्धन टीकम वर्मनाच्या कर्तबगारीवर फारच फिदा झाला होता. तो त्याच्या कर्तबगारीची वाखाणणीच करीत नव्हता तर त्यानें टीकमला स्थानेश्वराचा 'नगराधिप' हि बनविलें होतें. आज जिल्हाधिकाऱ्याला जो अधिकार असतो, तोच अधिकार तत्कालीन 'नगराधिपां'ना असे.

अशा रीतीनें कांहीं दिवस, कांहीं महिने, अयनें नि वर्षें निघून गेल्यावर एके दिवशीं टिकोलीनें एका सुंदर पुत्ररत्नाला जन्म दिला

टीकमानें त्याच्या बारशाचा समारंभ मोठ्या थाटामाटांत केला नि त्याचें 'कांतिवर्मन' असें नांव ठेवलें.

टिकोली ही पहिलटकरीण असल्यानें तिला बालसंगोपनाचें विशेषसें ज्ञान नव्हतें ही गोष्ट खरी असली, तरी तें सुंदर बालक पहातांच तिला आनंद झाला नि ती आपला सारा वेळ त्याच्या लालनपालनांत घालवूं लागली. त्या बाळाला बोलतांहि येत

नव्हतें; पण तशा स्थितींतच ती त्याच्याशीं तासन् तास बोलत बसे. घरांत नोकराचाकरांना कमतरता नव्हती; पण त्या बाळाचें प्रत्येक काम ती आपल्या हातांनीं करीत असे अन् तें काम ती मनापासून करीत असे.

होतां होतां कांतिवर्मनाला दुसरें वर्ष लागलें. तो बोबडे बोल बोलूं लागला.

एक दिवशीं तो कांहीं केल्या झोंपेनासा झाला, म्हणून ती त्या बोबडकांद्याला गाणें गाऊन झोंपविण्याचा प्रयत्न करूं लागली--

हांसणें पुरे हें आतां । हंसशील किती लडिवाळा ! ।।
बोबडे तुझे हे बोल । ते कसे कळावे मजला ? ।।
झोंप तुझी कोणी नेली ? । लाडक्या नको हा चाळा ! ।।
उगिच कां असा हुंदडशी ! ।
किति दंगामस्ती करिशी ।
शांतपणें कां ना निजशी ? ।
तुजसवें बसुनि का राहूं ? । थोडाही वेळ न मजला ! ।
भालींची तीट कुठें ती ? । कां पुसुनी तूं टाकियली ? ।
काय तरी सांगूं बाई ! । मी कितीकदां लावियली ? ।।
केलेंस काय हें वेडया ? ती तुजला का नावडली ? ।।
जें मी नेत्रां लावियलें ।
तें काजळ कोठें गेलें ? ।
तव गालीं कां ओघळलें ? ।
हें असें कसें कांतीनें ! कां केलें न कळे मजला ! ।।
नीज नीज आतां छकुल्या । हा पुरे करीं तव चाळा ।।
'नाई दा !' मजला म्हणशी ? । आला बघ बागुल काळा ।।
तूं नको नको रे येऊं । लागली झोंप कांतीला ! ।।

अन् काय? बोला फुलाला गांठ पडावी तसें झालें! टिकोलीनें आपल्या छबकड्याला काल्पनिक बागुलबुवाची भीति दाखविली; पण चुडीनें वाघाला बोलावून आणावें तसा प्रकार घडला! अचानक तिथें बागुलबुवा प्रत्यक्षच प्रकट झाला. त्याला पहातांच तिचें पुढचें गाणें थांबलें! जणु दांतखीळच बसली तिची.

तो जवळ आल्यावर टिकोलीनें त्याला ओळखलें! भोलन होता तो!

विकट हास्य करतां करतां त्यानें तिला हांक मारली, 'देवी! टिकोली!'

त्याला पहातांच टिकोलीचें काळीज धडधडूं लागलें; पण ती शांत राहिली! तिनें त्याला कांहींच उत्तर दिलें नाहीं.

भोलननें तिला विचारलें, 'नगराधिप कुठें गेले?'

लगोलग शांतरसाचें रूपांतर रौद्ररसांत झालें. टिकोलीचा राग तिला अनावर झाला. ती भोलनला चवताळलेल्या वाघिणी-सारखी किंवा फणकारलेल्या नागिणीसारखी भासली.

तिनें त्याला कठोर स्वरांत विचारलें, 'त्यांच्या बाबतींत मला भलतेसलते प्रश्न विचारणारे तुम्ही कोण? लगेच चालते व्हा इथून! इथें आलांतच कशाला?'

भोलन म्हणाला, 'अशी रागावतेस कां टिकोली? मी तुझ्याशीं चार शब्द बोलणार नि इथून निघून जाणार; पण मी भोलन लुटारू आहें याची जाणीव ठेव! तूं आतां जशी वागलीस, तसें शत्रूशींहि वागत नसतें कुणी; पण मी तुझा शत्रु नसून मित्र आहें हें विसरूं नकोस!'

टिकोली रागानें आपले दांतओंठ खाऊं लागली.

तिनें आपल्या मुलाला कवेंत कवटाळून धरलें.

भोलन तिला म्हणाला, 'आज रानांतली 'कवडी' घर-

ट्यांत आपल्या पिल्लाशीं एकटीच खेळत बसली आहे! सोबत 'कवड्या'ला कां नाहीं घेतलें तिनें?'

भोलननें टिकोलीला कवडी नि टीकमला कवडा असें कुत्सितपणें म्हटल्यामुळें तिला भयंकर चीड आली. भोलनला खाऊं कीं गिळूं असें तिला झालें.

ती त्याला म्हणाली, 'तुम्ही इथून निघून गेलां नाहींत, तर मी आरडाओरड करीन. त्यानंतर तुम्ही पकडले जाल नि तुमची अवस्था कठीण होईल!'

त्यावर भोलन म्हणाला, 'जरा धीर धर! मी इथें कां आलों आहें तें तुला सांगतों; पण ज्याअर्थी मी तुझ्या घरांत आलों आहें, त्याअर्थी गृहस्थधर्मानुसार अगोदर माझें आगतस्वागत तरी करशील कीं नाहीं? राहतां राहिला पहारेकऱ्याचा प्रश्न; पण तो मला आंत येऊं देईना, म्हणून मी त्याला तिथच्यातिथेंच जखडून टाकलें आहे!'

असें म्हणून तो टिकोलीकडे न्याहाळून पाहूं लागला.

टिकोली त्याला म्हणाली, 'तुम्ही नागवनांतून आलां आहांत, त्यासाठीं माझ्या माहेरचें माणूस म्हणून मी तुमचें आगत-स्वागत करतें; तथापि तुम्ही एक लुटारू म्हणून इथें आलां असाल, तर माझ्याकडून तुमचें आगतस्वागत तर होणार नाहींच; उलट तुमचा अनादर मात्र होईल याची जाणीव ठेवा.'

भोलन म्हणाला, 'मी नागवनांतला निवासी आहें असें समज! बऱ्याच दिवसांत तुला भेटलों नव्हतों, म्हणून आज तुला भेटण्यासाठीं आलों इथें! जर मी कांहीं बरेंवाईट बोललों असेन, तर त्या बाबतींत तूं मला क्षमा कर!'

टिकोली मनांत म्हणाली, 'भोलन माझ्या माहेरचा माणूस आहे. 'माहेरचा कावळा तो माझा मावळा' असा वाक्प्रचारच

आहे मुळीं. त्याच्या मनांत माझ्याविषयीं प्रेम उत्पन्न झाल्यामुळें तो मला भेटायला आला असेल ! कदाचित तो एखाद्या महत्त्वाच्या कामासाठींहि आला असेल; त्यामुळें त्याला आपलें घर दाखविणें आवश्यक आहे. गृहस्थाश्रमी लोकांचें कर्तव्यच असतें तें !'

असा विचार केल्यावर ती त्याच्यासह भवनाच्या आंतल्या भागांत गेली.

तिनें त्याला प्रथम आपल्या सुसज्जित शयनागारांत नेलें नि तिथल्या पलंगावर बसायला सांगितलें.

भोलननें तिचें शयनागार भिरभिरत्या नजरेनें पाहिलें. आंतली प्रत्येक वस्तु जागच्याजागीं ठेवली असल्याचें त्याला दिसलें. तो मनांत जळफळूं लागला.

कांहीं वेळानें तो तिला म्हणाला, 'देवानें तुला सारीं सुखें दिलीं आहेत !'

त्यावर टिकोली म्हणाली, 'देवाच्या दयेनें मला कशाचीच कमतरता नाहीं.'

भोलन हळूंच म्हणाला, 'कधींतरी नागवनांत ये नि तिथल्या लोकांना तुझ्या या वैभवाची कहाणी सांग.'

टिकोली म्हणाली, 'आतां तिथे काय आहे माझें ? या बाळाचे वडील हेच माझे आईबाप, भाऊन्नहीण वगैरे सारें कांहीं आहेत. त्यांना सोडून मी आतां कुठेंहि जाणार नाहीं.'

टिकोलीचें तें निर्वाणीचें बोलणें ऐकतांच भोलन तिच्याकडे क्रुद्ध नजरेनें पाहूं लागला.

त्याचा तो भयानक चेहरा पाहिल्यावर टिकोली थरथर कांपूं लागली.

तितक्यांत भोलननें तिच्या हाताला धरलें नि तो तिला म्हणाला, 'रावणानें पूर्वीं सीतेला पळलून नेलें होतें. त्याप्रमाणें

मी तुला आतां इथून पळवून नेणार ! मी तुझ्याशीं लग्न लावण्याच्या बाबतींत बोललों होतों, तेव्हां तूं अपमानास्पद उत्तर दिलें होतेंस त्याची मला अजून आठवण आहे !'

टीकमच्या अनुपस्थितींत भोलन आपल्या घरीं वाईट हेतूनें आला असल्यानें आपण त्याच्याशीं युक्तीनेंच वागलें पाहिजे असें टिकोलीला वाटलें; म्हणून ती त्याला म्हणाली, 'भोलन, अजूनहि तुमच्यावर माझें प्रेम आहे, माझें लग्न टीकम वर्मनाशीं झालें, हा केवळ योगायोग. माझा हात सोडा, मी तुमच्याबरोबर यायला तयार आहें !'

भोलनचें अंत:करण पाझरलें. तो तिला म्हणाला, 'तुझें बोलणें सत्य आहे अशी शपथ घे अगोदर !'

टिकोली म्हणाली, 'तुमच्यावर माझें पूर्ववत् प्रेम आहे हें मी शपथेवर सांगतें तुम्हांला, खरें म्हणजे मी तुमचीच वाट पहात होतें. मी परजातीच्या माणसाशीं लग्न लावलें हें बरें केलें नाहीं. बाह्यात्कारी मी तुम्हाला सुखी दिसत असलें, तरी मी अंतर्यामीं दु:खीच आहें. तुम्ही माझ्या शब्दांवर विश्वास ठेवा !'

भोलननें तिचा हात सोडून दिला.

टिकोली त्याच्यापासून जराशी दूर उभी राहिली नि मनांत विचार करूं लागली, 'आतां काय बरें करायचें ?'

तितक्यांत भोलन तिला म्हणाला, 'झटपट आटोप, नपेक्षां तुझा नवरा घरीं येईल. बाहेर माझा घोडा उभा आहे. मी तुला घोड्यावर बसवून नेईन.'

भोलन मनांतल्या मनांत मांडे भाजूं लागला !

पण टिकोलीनें त्याला विचारलें, 'या बाळाचें काय करूं ?'

भोलन म्हणाला, 'त्यालाहि आपल्यासोबत नेऊं नि आपण दोघेंहि त्याचें लालनपालन करूं ! मीहि बराचसा पैसाअडका

कमावला आहे आतांपर्यंत.'

टिकोलीनें थोडा वेळ मनांत कांहींतरी विचार केला नि नंतर ती भोलनला म्हणाली, 'बाळाचे वडील यायला अजून अवकाश आहे. तुम्ही इथेंच बसा. माझ्यापाशीं सोन्याचांदीचे कांहीं दागदागिने आहेत, ते मी घेऊन येतें. आपल्यापाशीं पैसा असला, तर तो अडीअडचणीच्या वेळीं उपयोगी पडतो.'

असें म्हणून ती झटदिशीं आंत निघून गेली. तिनें आपल्या मोलकरणीला हांक मारली; पण तिच्या हांकेला कुणी ओ दिली नाहीं.

भोलनच्या साथीदारांनीं साऱ्या मोलकरणींना कुठेंतरी बांधून ठेवलें असावें नि भोलन चोरासारखा एकटाच घरांत घुसला असावा असा टिकोलीला संशय आला. तिला कुणाचीहि मदत मिळणें अशक्य झालें.

पण तिनें धीर सोडला नाहीं. ती शस्त्रागारांत गेली नि तिथली एक तलवार हातांत घेऊन जिथें भोलन बसला होता, तिथें आली!

भोलन पाठमोरा बसला होता नि कसल्यातरी विचारांत गढून गेला होता.

टिकोलीनें क्षणाचाहि विलंब लावला नाहीं. सिंहीण जशी हत्तीच्या पाठीवर उडी मारून बसते, तशी ती भोलनच्या पाठीवर उडी मारून बसली! त्यानंतर तिनें आपल्या हातांतल्या तलवारीचें टोंक त्याच्या पाठींत खुपसलें नि ती त्याला म्हणाली, 'भोलन! थोड्या वेळापूर्वीं तुझ्याशीं हंसत हंसत बोलणारी टिकोली ती मीच आहें बरें! तुझें बरें व्हावें असें वाटत असेल, तर तूं बऱ्या बोलानें इथून निघून जा, न पेक्षां कुत्र्याच्या मोतीनें नाहक मरून जाशील.'



भोलननें मागें वळण्याचा प्रयत्न केला; पण टिकोलीनें वेळ न गमावतां त्याच्या खांद्यावर तलवारीचा जोरानें वार केला. भोलनचा हात खांद्यापासून तुटून पडला. टिकोलीच्या शयनागारांत रक्ताचें थारोळें सांचलें.

तुटलेला हात आपल्या दुसऱ्या हातांत धरून भोलन तिच्या शयनागारांतून बाहेर पळून गेला नि झाडांच्या आड लपतछपत तिथून दूर निघून गेला.

✦ ✦

## नऊ

बाहेर गेलेला टीकम आपल्या भवनांत परत आल्यावर टिकोलीनें भोलनच्या बाबतींत घडलेला सारा प्रकार त्याला सविस्तर सांगितला नि त्याला आपल्या शयनागारांतील रक्ताचें थारोळेंहि दाखविलें.

तें सारें ऐकल्यापाहिल्यावर टीकमच्या अंगांतलें रक्त सळसळूं लागलें.

तो टिकोलीच्या धैर्याची वाखाणणी करतांना तिला म्हणाला, ' टिक्को, तूं त्या दुष्टाला जें शासन केलेंस, तें योग्यच होतें. मला त्याबद्दल आनंद होत असला, तरी मी त्याला माझ्या हातानें अद्दल घडवीपर्यंत स्वस्थ बसणार नाहीं. मुंगीचें मरण जवळ आल्यावर तिला पंख फुटतात. भोलन माझ्या हातून मरावा अशी ईश्वरी इच्छा दिसते ! '

टिकोली म्हणाली, ' ठीक आहे. तुम्ही तुमच्या सैनिकां-मार्फत त्याचा शोध करा नि सांपडल्यावर त्याला वाटेल तेवढें कठोर शासन करा. '

टिकोलीचें बोलणें ऐकून घेतल्यावर टीकमनें आपल्या योग्य कर्मचाऱ्यांना बोलावलें नि त्यांना भोलनला पकडण्याविषयीं आज्ञा केली.

टीकमनें दुसऱ्या दिवशीं भोलनच्या अपराधाबद्दल सम्राटाशीं चर्चा केली, त्यावेळीं सम्राट म्हणाला, 'साऱ्या राज्यांत गुप्तचर पाठवा. तो कधीं ना कधीं तरी पकडला जाईल.'

सम्राटाच्या आज्ञेनुसार टीकमनें गुप्तचर पाठवून दिले.

सम्राट हर्षवर्धनाचें राज्य त्याकाळीं बरेच विस्तारलें होतें.

राज्यांत चोहोंकडे शांतता होती. दुर्घटना सहसा कोठेंहि घडत नव्हत्या. राज्यांतले लोक आपापले उद्योगधंदे इमानें इतबारें करीत असत; तथापि सीमाप्रांतांत मात्र अधूनमधून कोणतीं ना कोणतींतरी उपद्रवी कृत्यें घडत असत. सम्राटाचे सैनिक त्या बंडांचा बींमोड करीत असत; तथापि त्यांना तें अशक्य झालें, तर राजधानीतून केंद्रीय सैनिक पाठवून देण्याबद्दल ते सम्राटाला विनंति करीत असत.

सम्राटाला कोणी तशी विनंति केली कीं, सम्राट एखाद्या शूर माणसाच्या हाताखालीं कांहीं सैनिक देत असे नि त्याला तिथें सरदार म्हणून पाठवून देत असे.

त्या सरदारांना त्या काळीं 'उपरिक' अशी संज्ञा होती.

त्या उपरिकांना अधिकारहि जास्तच होते. जे उपरिक सज्जन असत, ते तिथल्या लोकांना सुख देत असत; उलट जे दुर्जन असत, ते तिथल्या लोकांचा फारच छळ करीत असत.

त्या काळीं आतांच्यासारखीं जलद प्रवास करण्याचीं साधनें नव्हतीं, म्हणून लोक प्रवासासाठीं हत्ती, घोडे, खटारे यांचा उपयोग करीत असत. त्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पोहोंचण्यास महिनेच्या महिने लागत असत. त्यांना लहानमोठ्या

रानावनांतून प्रवास करावा लागत असे. त्या रानावनांत तिथल्या वन्य पशूंप्रमाणेंच चोर डाकूहि लपून रहात असत नि प्रवासी लोकांना ठार मारून त्यांच्यापाशीं असलेला पैसाअडका लुटीत असत. त्या कारणानें त्या काळचे प्रवासी संघटित स्वरूपांत प्रवास करीत असत नि त्यावेळीं ते आपल्यासोबत धनुष्यबाण, भालेबरच्या इत्यादि आयुधें घेत असत

सीमा प्रांतांतल्या कांहीं शहरांत छलक लोकांचा धुमाकूळ चालू असून, सबळ लोक निर्बलांना सतावन सोडीत असल्याच्या बातम्या सम्राटाच्या कानावर येऊं लागल्यामुळें छलक लोकांचा नि:पात करण्यासाठी लायक अशा कोणातरी इसमाला तिकडे पाठविणें जरूर आहे असें त्याला वाटलें.

विचार करतां करतां त्याला टीकम वर्मनाचें नांव आठवलें.

त्यानें टीकमला बोलावून आणलें नि तो त्याला म्हणाला, 'टीकम वर्मन, सीमा प्रांतांतल्या कांहीं शहरांत छलक लोकांनीं खूपच गोंधळ माजविला आहे असें मला गुप्तचरांकडून कळलें आहे. त्यांनीं बऱ्याच लोकांना ठार मारलें आहे; त्यासाठीं तुम्हांला मीं उपरिक म्हणून सीमा प्रांतांत पाठविण्याचा विचार केला आहे. उद्यां सकाळीं तुम्ही दोन हजार सैनिक बरोबर घ्या नि सीमा प्रांतांत जा. तिथें जाऊन पोहोंचल्यावर तुमच्या कार्यांत तुम्ही यशस्वी व्हाल असा मला विश्वास वाटत आहे '

टीकमनें हर्षाच्या आज्ञेला होकार दिला. तो हर्षाला म्हणाला, 'महाराज, माझा प्राण गेला तरी चालेल; पण मी आपल्या आज्ञेचा अनादर कधींहि करणार नाहीं !'

दुसऱ्या दिवशीं टीकम दोन हजार सैनिक बरोबर घेऊन सीमा प्रांताकडे निघून गेला.

त्याला स्थानेश्वरापासून प्रथम पाटलिपुत्राला नि तिथून दक्षिण दिशेला जायचें होतें.

पंधरवडाभर खडतर प्रवास केल्यावर तो सीमा प्रदेशांत जाऊन पोहोंचला.

तिथें गेल्यावर लुटारू लोक गुप्तपणें लोकांच्या घरांत शिरतात नि घरांतल्या लोकांना मारहाण केल्यावर त्या घरांतला पैसाअडका लुटून पोबारा करतात असें त्याला दिसून आलें.

लुटारू लोकांनी घरेंदारें लुटल्यावर त्या घरांतली निर्धन नि शक्तिहीन माणसें फक्त आक्रोश करीत असत. त्यापेक्षां त्यांच्या हातून दुसरें कांहींच घडण्यासारखें नव्हतें.

त्यामुळें टीकम सीमा प्रदेशांत गेल्यावर त्यानें प्रथम राज्य-कर्मचाऱ्यांना एकत्र जमविलें नि त्यांच्या मदतीनें आपल्यासोबतच्या साऱ्या सैनिकांना ठिकठिकाणीं पाठवून दिलें.

त्यानें केलेल्या त्या वैचारिक व्यवस्थेमुळें गुन्हेगारीला बराचसा आळा बसला.

परिणामीं थोड्याच दिवसांत साऱ्या सीमा प्रांतांत शांतता दिसूं लागली.

त्या कालांत जे जे गुन्हेगार हातीं सांपडले, त्यांना त्यांना टीकमनें उचित असें शासन केलें. त्यानें त्यावेळीं अस्थानीं दया दाखविली नाहीं !

त्यानें जनतेच्या कल्याणासाठीं त्याला करतां येण्यासारखा होता, तितका जास्तींत जास्त पैसा खर्च केला. लायक माणसें निवडून काढून त्यांच्याकडे निरनिराळीं कामें सोपवून दिलीं. इतकेंच नव्हे तर प्रसंगीं गुन्हेगारांना तलवारीनें ठार मारण्याचा अधिकारहि त्यानें सैनिकांना दिला

आपल्या कर्तबगारीमुळें तो सीमा प्रदेशांतला जनताभिमुख

उपरिक म्हणून ओळखला जाऊं लागला. लोक त्याच्याकडे आदरयुक्त भावनेनें पाहूं लागले !

टीकमच्या कर्तबगारीची कीर्ति सम्राटाच्या कानीं गेली.

त्यामुळें लोकांत शांतता निर्माण झाल्यावर त्यांना बौद्ध धर्मातल्या चांगल्या चांगल्या गोष्टींची जाणीव करून देण्याबद्दल हर्षानें टीकमला आज्ञा केली. टीकम हा राजा नि प्रजा या दोघांचाहि आवडता झाला !

नरपतिहितकर्ता द्वेष्यतां यातिलोके ।
जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ।।
इति महति विरोधे वर्तमाने समाने ।
नृपति जनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ।।

टीकमनें हा श्लोक सार्थ असल्याचें सर्वांना दाखवून दिलें !

हर्षाचें आज्ञापत्र टीकमच्या हातीं आल्यावर त्यानें एक दिवशीं साऱ्या साधुसंतांचें सम्मेलन भरविलें नि त्यांना प्रवासखर्चासाठीं भरपूर पैसा देऊन बौद्ध धर्माचा प्रचार करण्यासाठीं ठिकठिकाणीं पाठवून दिलें.

हळूहळू त्या काळच्या प्रसिद्ध योद्ध्यांत टीकमची गणना होऊं लागली !

हर्षानें त्याची सीमा प्रदेशांत नेमणूक केली होती नि त्या प्रदेशांत तीर्थक्षेत्रेंहि बरींचशीं होतीं; त्यामुळें टीकमनें आपले आईबाप नि आपली पत्नी यांना त्या प्रदेशांतल्या बहुतेक तीर्थक्षेत्रांचें दर्शन घडविलें !

जेव्हां सीमा प्रदेशांतले लोक आपलें आयुष्य सुखासमाधानानें घालवूं लागले नि चोरांचिलटांची भीति पूर्णपणें नष्ट झाली तेव्हां हर्षानें टीकमला परत राजधानीला येण्याबद्दलचें आज्ञापत्र पाठवून दिलें.

हर्षाच्या आज्ञापत्रानुसार टीकमनें तिथला राज्यकारभार योग्य अधिकाऱ्यांच्या हातीं दिला नि तो परत राजधानीला जाण्यासाठीं निघाला.

जातांना त्याच्यासोबत बरेचसे सैनिक होते.

त्याला फार दूरचा प्रवास करावयाचा होता नि तोहि रानावनांतून करावयाचा होता, म्हणून त्यानें प्रवासाला निघण्यापूर्वीं खाण्यापिण्याला आवश्यक असलेल्या पदार्थांची तरतूद केली होती !

हिंवाळा संपला होता नि उन्हाळा सुरू झाला होता.

प्रवासांत त्याच्यासह साऱ्या सैनिकांना गरम वाऱ्याचे चटके बसत होते, म्हणून सकाळीं थोडा वेळ नि संध्याकाळीं थोडा वेळ असा त्याचा प्रवास चालत असे. मधल्या दुपारच्या वेळीं तो साऱ्या सैनिकांसह जंगलांतल्या झाडांपेडांच्या सावलींत विश्रांति घेत असे !

अशा प्रकारें सतत तीन दिवस प्रवास केल्यानंतर टीकम एका घनदाट जंगलांत जाऊन पोहोंचला.

त्या जंगलात लुटारू लोकांचें वास्तव्य होतें, म्हणून त्यानें साऱ्या सैनिकांना पुढच्या प्रवासांत सावध रहाण्याची सूचना दिली.

टीकमच्या सूचनेप्रमाणें सारे सैनिक मोठ्या सावधगिरीनें पुढच्या प्रवासाला लागले; पण तितक्यांत झाडांच्या फांद्यांवर लपून बसलेल्या लुटारू लोकांनीं धडाधड खालीं उड्या मारल्या नि ते टीकमच्या सैनिकांना मारझोड करूं लागले !

टीकमनें तो प्रकार पाहिल्यावर त्यानें आपल्या सैनिकांना त्या लुटारू लोकांशीं निकरानें झुंजण्याचा आदेश दिला.

मग काय ? हां हां म्हणतां त्या दाट जंगलांत भयंकर धुमश्चक्री सुरू झाली.

चोहोंकडे मेलेल्या माणसांचीं मुंडकीं दिसूं लागलीं.

आपल्या सैनिकांना प्रोत्साहन देण्यासाठीं टीकम मोठ्यानें ओरडून त्यांना म्हणाला, 'माझ्या शूर सैनिकांनो, साऱ्या लुटारूंना यमपुरींत पाठवून द्या. त्या लुटारू लोकांपैकीं एकाहि लुटारूला जिवंत सोडूं नका ! ...'

त्याचे ते प्रोत्साहक शब्द ऐकतांच सारे सैनिक त्या लुटारू लोकांशीं दुप्पट जोमानें लढूं लागले !

त्या वनांतल्या वनचरांना पाशवी युद्ध माहीत होतें; पण मानवी युद्ध कसलेंसें असतें, तें त्या बिचाऱ्यांना मुळींच ठाऊक नव्हतें, म्हणून ती लढाई पहातांक्षणींच सारीं जंगली जनावरें घाबरून गेलीं नि जिवाच्या भीतीनें वाट फुटेल तिकडे सैरावैरा पळत सुटलीं !

लुटारू लोक बरेचसे असून, आपल्या सैनिकांना सहजासहजीं कोंडींत पकडतां यावें या हेतूनें त्यांनीं चोहोंकडे आपले साथीदार ठेवले आहेत, ही गोष्ट टीकमच्यालक्षांत आली; तथापि लुटारू लोकांची संख्या किती मोठी आहे, तें मात्र त्याला समजेनासें झालें !

ते लुटारू लोक आपल्या सैनिकांशीं कां लढत आहेत, तेंहि त्याला कळेनासें झालें !

सैनिक नि लुटारू यांच्यांतली हातघाईची लढाई बराच वेळ चालल्यावर त्या लुटारू लोकांना घेराव घालतां यावा या हेतूनें टीकमनें आपल्यापाशीं असलेल्या सैनिकांची एक तुकडी पुढें पाठवून दिली.

त्यानें त्या तुकडींतल्या सैनिकांना सांगितलें, 'त्या लुटारू लोकांपैकीं जेवढ्यांना ठार करतां येण्यासारखें असेल, तेवढ्यांना बेलाशक ठार करा नि बाकीच्या पळपुट्या लुटारूंचा पाठलाग करून त्यांना दूर पिटाळून लावा !'

टीकमपाशीं असलेल्या सैनिकांपैकीं कांहीं सैनिक पुढें सरसावल्याचें पाहिल्यावर लुटारू लोक त्यांचा पाठलाग करूं लागले, पण तितक्यांत पूर्वीं ठरलेल्या योजनेप्रमाणें टीकमच्या सैनिकांनीं त्यांना एका उघड्या मैदानांत घेराव घातला.

टीकमचे सैनिक तशा प्रकारें आपल्याला वेढा देतील याची लुटारू लोकांना कल्पनाच नव्हती !

तथापि जात्यांत जसे गव्हाचे दाणे भरडले जातात, तशी त्या बिचाऱ्यांची अगतिक अवस्था झाली.

खटखट...खटखट...

ढाली नि तलवारी या एकमेकींवर जोरानें आपटूं लागल्या.

भुकेलेले सिंह ज्याप्रमाणें आपल्या भक्ष्यांवर तुटून पडतात त्याप्रमाणें टीकमचे सैनिक त्या लुटारू लोकांवर तुटून पडले.

'उजवीकडे वळा नि त्या लुटारू लोकांना पुरते वेढून टाका.' असा टीकमनें आपल्या सैनिकांना आदेश दिला.

सैनिकांनीं त्याचा आदेश अक्षरश: अंमलांत आणला.

टीकमच्या सैनिकांचें तें युद्धकौशल्य पाहिल्यावर लुटारू लोक जीव वांचविण्यासाठीं भराभर पळत सुटले.

टीकमनें आपल्या सैनिकांना पुन्हां आदेश दिला, 'एकाहि लुटारूला जिता जाऊं देऊं नका. सुरीनें गाजरें-मुळे कापतात, त्याप्रमाणें साऱ्या लुटारू लोकांना तलवारींनीं कापून काढा !'

टीकमच्या सैनिकांनीं त्याचा आदेश अक्षरश: अंमलांत आणला ! लुटारू लोक मेंढ्यांबकऱ्यांप्रमाणें कापले गेले.

तथापि तितक्यांतच कुणातरी स्त्रीचा रोदनस्वर टीकमच्या कानीं पडला !

तो स्वर कानीं पडतांच टीकम आश्चर्यचकित झाला नि आपल्या आजूबाजूस पाहूं लागला; पण त्याला कुणीहि स्त्री दिसली नाहीं कुठें !

त्याला स्त्रीचें करुणक्रंदन ऐकूं आलें; तथापि आक्रोश करणारी स्त्री मात्र दिसली नाहीं, म्हणून त्याला ज्या दिशेकडून आवाज ऐकूं आला होता, त्या दिशेकडे त्यानें आपला घोडा पिटाळला !

थोड्याच वेळांत तो एका दाट झाडीपाशीं जाऊन पोहोंचल्यावर एक लुटारू एका स्त्रीच्या हाताला धरून तिला ओढून नेत असल्याचें त्याला दिसलें.

तें दृश्य पहातांच टीकमनें जरासुद्धां वेळ न गमावतां भात्यांतल्या एक बाण काढला, तो धनुष्याच्या प्रत्यंचेला जोडला नि तो त्या लुटारूच्या दिशेनें सोडला !

टीकमनें सोडलेला तो बाण त्या लुटारूच्या एका डोळ्यांत घुसतांक्षणीं तो जागच्या जागीं कोसळून पडला. थोड्याच वेळांत तो लुटारू गतप्राण झाला.

तेवढ्या अवधींत कांहीं लुटारू मरून गेले होते, कांहीं जखमी होऊन जमिनीवर आडवे पडले होते. नि कांहीं पळूनहि गेले होते !

टीकम आपल्या घोड्यावरून खालीं उतरला नि तो त्या स्त्रीपाशीं गेला.

ती तरुणी पंचवीस सव्वीस वर्षांची असावी असें त्याला वाटलें.

ती देखणीहि होती ! लाखांत नसली तरी हजारांत उठून दिसण्याइतकी ती देखणी होती !

टीकमनें त्या तरुणीला विचारलें, ‘ तूं कोण आहेस बाई ? तुझें नांव काय ? तूं इथें आलीस कशी ?’

त्यावर ती तरुणी म्हणाली, ‘ माझें नांव मंदला असें असून मी उत्तरापथाच्या एका वणिकाची कन्या आहें. या दरोडेखोरांनीं काल रात्रीं आमच्या घरावर दरोडा घातला नि मला इथें पळवून आणलें. या संकटसमयीं आपण माझें रक्षण केलेंत. परमेश्वर आपल्याला सामर्थ्य देवो !’

ती आणखीनहि कांहींतरी बोलणार होती; पण तेवढ्याच बोलण्यानें ती थकून गेली. तिला पुढें बोलतां येईनासें झालें. तिचा चेहरा घामानें डबडबून गेला. तिच्या घशाला कोरड पडली नि ती भीतीनें थरथर कांपूं लागली.

त्या लुटारू लोकांनीं मंदलेला जखमी केलें असावें असें टीकमला वाटलें.

‘ तूं आमच्याबरोबर चल. मी तुला वणिक महाशयांकडे पोहोंचती करतों.’ टीकमनें तिला आश्वासन दिलें.

‘ तथापि...’

त्यानंतर तिच्या तोंडांतून एक अक्षरहि निघालें नाहीं. ती बेशुद्ध होऊन जमिनीवर उपडी पडली.

ती उपडी पडतांच तिच्या पाठींत खुपसलेली कट्यार टीकमला दिसली.

त्यानें ती तलवार उपसून काढतांच तिच्या पाठींतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या.

टीकमनें तिच्या तोंडावर पाण्याचे हबके मारले; तथापि तिनें आपले डोळे उघडले नाहींत.



ज्या लोकीं दरोडेखोरांना जातां येणें अशक्य होतें, त्या लोकीं तिचा अमर आत्मा निघून गेला फक्त तिचें कलेवरच तिथें राहिलें.

टीकमच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या.

त्यानें तिचें शव एका रथांत घातलें नि तो आपल्या सनिकांसह तिथून निघून गेला.

# दहा

लुटारू नि दरोडेखोर यांनीं हर्षाच्या सीमा प्रदेशांत जसा धुमाकूळ माजविला होता, तसाच तो स्थानेश्वर शहरांतहि माजविला होता.

स्थानेश्वर शहरांत हर्षाचे राखीव सैनिक होते ही गोष्ट खरी असली तरी लुटारू किंवा दरोडेखोर टोळचांटोळचांनीं अचानक येत असत नि लूटमार केल्यानंतर लगेच पळून जात असत; त्यामुळें त्यांचा बंदोबस्त करणें सैनिकांना कठीण जात असे.

लुटारू किंवा दरोडेखोर यांचा पुरता नायनाट होण्यासाठीं कोणतीतरी उपाययोजना शोधून काढली पाहिजे असें हर्षाला वाटत असे.

हर्षाचा सेनापति भांडी यानें कांहीं चोरांदरोडेखोरांना ठार केलें होतें नि कित्येकांना पळवूनहि लावलें होतें; तथापि पळून गेलेले लुटारू लोक पुन्हां येत असत नि लोकांची लूटमार केल्यावर परत जात असत.

टीकम सीमा प्रदेशांतून परत आल्याचें सम्राटाला समजल्यावर त्यानें त्याला बोलावणें पाठविलें.

टीकम राजमहालांत गेला नि त्यानें सम्राटाला प्रणाम केला.

सम्राट त्याला म्हणाला, 'तुम्ही सीमा प्रदेशांतल्या लहानमोठ्या साऱ्या शहरांत शांतता प्रस्थापित केली आहे, त्याबद्दल मी तुमचें हार्दिक अभिनंदन करतों; तथापि आतांशा या स्थानेश्वर शहरांत लुटारू लोकांचा धुमाकूळ माजला आहे, म्हणून तुम्ही ज्या उपायांच्याद्वारें सीमा प्रदेशांत शांतता प्रस्थापित केलीत, त्याच उपायांच्याद्वारें या स्थानेश्वर शहरांतहि शांतता प्रस्थापित करावी अशी माझी इच्छा आहे. त्या कामीं तुम्हांला सैनिक नि पैसा यांची मी भरपूर मदत करीन.'

टीकमनें सम्राटाची आज्ञा शिरोधार्य मानली नि त्याचा निरोप घेतल्यावर तो राजमहालांतून निघून गेला.

त्यानें दुसऱ्या दिवशीं कांहीं निवडक सैनिक शहरांतल्या निरनिराळ्या भागांत बंदोबस्तासाठीं ठेवून दिले नि दरोडेखोर दिसतांक्षणींच त्यांना बेलाशक ठार मारण्याचा त्या सैनिकांना आदेश दिला.

त्याचप्रमाणें त्यानें साऱ्या शहरांत जागोजागीं गुप्तचरहि ठेवून दिले.

त्यामुळें त्याच्या कार्यांत त्याला उत्तरोत्तर यश मिळूं लागलें.

टीकमला सत्ता नि संपत्ति हीं दोन्ही प्राप्त झालीं होतीं; तथापि त्यानें आपला आचारधर्म सोडला नव्हता. आपला नेमधर्म तो आपल्या पत्नीसह कसोशीनें पाळत असे.

समर्थ रामदासस्वामींनींहि आपल्या दासबोधांत असेंच सांगितलें आहे. त्यांनीं चक्क लिहून ठेवलें आहे कीं–

आचार उपासना सांडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती ।
जळो तयांची महती । कोण पुसे ?॥
आधीं राखावा आचार । मग पहावा विचार ।
आचार विचारें पैलपार । पाविजे तो ॥

टीकमच्या कारकीर्दींत रामदासस्वामी जन्मले नव्हते, तरीहि तो सदाचारी होता हें सत्य ! एक दिवशीं सकाळची वेळ होती. टीकम नि टिकोली या दोघांनींहि नित्याच्या पद्धतीप्रमाणें देवाची पूजाअर्चा आटोपल्यावर त्यांनीं देवाच्या प्रार्थनेला सुरुवात केली होती–

न त्वहं कामये राज्यं न स्वर्गं ना पुनर्भवम् ।
कामये दुःखतप्तानां प्राणिनां आर्तिनाशनम् ॥
स्वस्ति प्रजाभ्यः परिपालयंतां । न्याय्येन मार्गेण महीं महीशाः॥
गोब्राह्मणेभ्यः शुभमस्तु नित्यं । लोकाः समस्ताः सुखिनो भवंतु॥
नमस्ते सते ते जगत्कारणाय । नमस्ते चिते सर्वलोकाश्रयाय ॥
नमोऽद्वैततत्त्वाय मुक्तिप्रदाय । नमो ब्रह्मणे व्यापिने शाश्वताय॥
त्वमेकं शरण्यं त्वमेकं वरण्यं । त्वमेकं जगत्पालकं स्वप्रकाशम्॥
त्वमेकं जगत् कर्तृपातृप्रहर्तृ । त्वमेकं परं निश्चलं निर्विकल्पम् ॥
भयानां भयं भीषणं भीषणानां ।
गतिःप्राणिनां पावनं पावनानाम् ॥
महोच्चैः पदानां नियंतृ त्वमेकं । परेषां परं रक्षणं रक्षणानाम् ॥
वयं त्वां स्मरामो वयं त्वां भजामो ।
वयं त्वां जगत्साक्षिरूपं नमामः ॥
सदेकं निधानं निरालंबमीशं । भवांभोधिपोतं शरण्यं व्रजामः ॥

टीकम नि टिकोली हीं एकाग्र मनानें देवाची प्रार्थना करीत होतीं; पण तितक्यांत बाहेर खेळत असलेला कांति वर्मन हातांत एक लहानशी तलवार घेऊन तिथें आला नि टीकमला म्हणाला, 'पिताजी, मी या माझ्या तलवारीनें लुटारू लोकांचीं मुंडकीं कापून काढणार!'

त्याचें तें बालिश बोलणें ऐकतांच त्याचे आईबाप त्याच्याकडे आश्चर्यानें पाहूं लागले.

टीकमनें कांतीला विचारलें, 'त्या लुटारू लोकांनीं तुझें कोणतें नुकसान केलें आहे?'

कांति म्हणाला, 'त्यांनीं लोकांची लूटमार चालविली आहे!'

'मग त्यांचा बंदोवस्त सम्राट करतील! आपण सम्राटांचे सेवक आहोंत.' टीकमनें त्याला सांगितलें.

त्यावर कांति वर्मन चिडून म्हणाला, 'नाहीं, नाहीं, मी इथला राजा आहें!'

त्याचें तें आढ्यतेचें बोलणें ऐकतांच टिकोली हंसत हंसत त्याला म्हणाली, 'तर मग महाराज, आम्हां सेवकांवर आपली कृपादृष्टि असूं द्या!'

कांति म्हणाला, 'आमची साऱ्या सेवकांवर कृपादृष्टि असते!'

टीकम नि टिकोली हीं दोघेंहि खदखदां हंसूं लागलीं. तीं कां हंसूं लागलीं तें कांतीला कळलें नाहीं; पण तोहि त्यांच्या हास्यांत सामील झाला.

अशा प्रकारें तीं तिघेंहि रमून गेलीं होतीं; पण तितक्यांत सम्राटाचा सेवक तिथें आला नि टीकमला म्हणाला, 'सम्राटांनीं आपल्याला लगेच बोलाविलें आहे.'

टीकम विनाविलंव सम्राटाला भेटण्यासाठीं निघून गेला.

राजवाड्यांत पोंचल्यावर त्यानें हर्षाला प्रणाम केला नि तो हात जोडून बाजूला उभा राहिला.

हर्ष त्याला म्हणाला, 'मी आतां मदनवनांत विहार करण्यासाठी जाणार आहें. तुम्हीहि माझ्यासोबत या.'

'आज्ञा महाराज !'

असें म्हणून टीकम हर्षाबरोबर मदनवनांत जाण्यासाठीं निघाला.

मदनवन स्थानेश्वरापासून थोडेंसें दूर होतें. त्या वनांत गगनचुंबी वृक्ष नि मोठमोठे डोंगर होते. सिंह, वाघ, हरिण इत्यादि वन्य पशु त्या वनांत स्वच्छंदानें हिंडतफिरत असत. त्या वनाच्या मध्यभागीं हर्षानें एक तलावहि खोदला होता. त्या तलावांत रंगबेरंगी मासे विहार करीत असत. हर्षानें बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर तिथें बुद्धाचें एक मंदिरहि बांधलें जात होतें !

हर्ष हिंडतांहिंडतां तलावापाशीं जाऊन पोहोंचला, तेव्हां तलावाच्या कांठाशीं उगवलेल्या हिरव्यागार दुर्वांकडे त्याची सहज़ नजर गेली.

कांहीं वेळानें तो टीकमला म्हणाला, 'टीकम, या दुर्वा किती कोमल आहेत पहा ! देवानें या दुर्वा अवनीवर आंथरल्या आहेत; तथापि यांचें रक्षण करणारा कुणी निर्माण केला नाहीं त्यानें !'

त्यावर टीकम म्हणाला, 'क्षमा करा महाराज ! ज्यानें या दुर्वा निर्माण केल्या आहेत, त्याच्यावरच यांच्या संरक्षणाचा भार आहे !'

त्यावर हर्षानें त्याला विचारलें, 'तुमचा ईश्वरी सामर्थ्यावर विश्वास आहे ?'

टीकम म्हणाला, ‘ लहानमोठ्या साऱ्या माणसांनीं ईश्वरी सत्तेवर विश्वास ठेवला पाहिजे असें माझें मत आहे ! ’

हर्ष टीकमच्या चेहऱ्याकडे पाहूं लागला.

तितक्यांत त्याला कुणाच्या तरी किंकाळ्या ऐकूं आल्या.

हर्ष म्हणाला, ‘ या वनांत लुटारू लोक लपून बसले असावेत असें वाटतें. ’

टीकम घोड्यावर स्वार झाला नि त्यानें चोहोंकडे आपली नजर टाकली, तेव्हां आठदहा लोक एका झाडाखालीं बसले असल्याचें त्याला दिसलें.

त्या सर्वांच्या हातांत धनुष्यें, बाण, भाले, वरच्या इत्यादि आयुधें होतीं.

टीकम म्हणाला, ‘ अन्नदाते, आपली शंका रास्त आहे. या वनांत लुटारू लोक लपून बसले आहेत ! ’

हर्ष म्हणाला, ‘ आतां आपण जागरूक राहिलें पाहिजे ! ’

असें म्हणून तो आपल्या घोड्यावर स्वार झाला.

त्या दोघांनींहि आपापले घोडे एका मोठ्या वृक्षाच्या आडोशाला उभे केले.

कांहीं वेळानें ते लुटारू लोक त्या वाटेनें जाऊं लागले, तेव्हां हर्ष नि टीकम या दोघांनींहि त्यांच्यावर बाण सोडण्यास सुरवात केली.

त्या लुटारू लोकांपाशीं घोडे नव्हते. ते पायींच चालत होते.

आपल्यावर बाणांचा वर्षाव होतो आहे असें पहातांच ते जीव घेऊन पळत सुटले; पण सम्राट नि टीकम हे त्यांना सहजासहजीं सोडायला तयार नव्हते ! ते नेम धरून त्यांच्यावर बाण सोडूं लागले.

त्यांच्यापैकीं कांहीं लुटारू मरून पडले नि कांहीं पळून गेले.

अखेर एक लुटारू उरला ! त्याला पळतां येत नव्हतें.

तो एका पायानें लंगडा होता नि त्याचा एक हात तुटला होता !



टीकम त्याच्यापाशीं धांवत गेला नि त्यानें त्याला पकडलें.

त्याला पहातांच तो हर्षाला म्हणाला, 'महाराज, भोलन दरोडेखोर तो हाच ! हा बरेच दिवस हात धुवून माझ्या पाठीं लागला होता ! यानेंच आमच्या राज्यांत उच्छाद मांडला होता ! आपण याला वाटेल तें शासन करा !'

हर्ष म्हणाला, 'याला घोड्याच्या पाठीशीं बांधा नि शहरांत घेऊन चला. तिथें गेल्यावर याच्या बाबतींत पुढें काय करायचें तें ठरवितां येईल !'

# अकरा

स्थानेश्वराला पोहोंचल्यावर हर्षाच्या आज्ञेनुसार भोलनला कारागारांत ठेवण्यांत आलें. दुसऱ्या दिवशीं त्याचा शिरच्छेद करायचा असें हर्षानें ठरविलें होतें.

दुसऱ्या दिवशीं त्याला हर्षाच्या न्यायासनापुढें उभें करण्यांत आलें.

टीकम त्याला न्यायासनासमोर नेत असतां तो टीकमाला म्हणाला, ' मित्रा, माझ्या हातून आतांपर्यंत अनंत अपराध घडले आहेत. माझ्या हातून जीं अपकृत्यें घडलीं आहेत, त्याबद्दल मला आतां पश्चात्ताप होत आहे ! सम्राट मला देहांत शासन करणार हें मला माहीतच आहे; पण माझी अवस्था आज ' असुनि जिवंतहि मेल्या ' सारखीच आहे ! तूं जर महाराजांना मला क्षमा करायला सांगशील, तर मी तुझा आजन्म ऋणी राहीन ! यापुढें मी असलीं नीच कृत्यें करणार नाहीं असें मी तुला अभिवचन देतों ! मी यानंतर कुठेंतरी भीक मागेन नि पोटाची खळगी

भरीन ! पहिल्यान्दां तुझ्याच दारांत येईन भीक मागायला. अन् तूं मला हाकलून लावलास तर काय ? एक घर उणें तर दसघर पुणें आहेच ! एवढें मोठें स्थानेश्वर शहर आहे. मी पुढच्या घरीं जाईन भीक मागायला. माझ्यासारख्या थोटच्या पांगळ्याची कुणीहि कींव करील !'

त्यावर टीकम त्याला म्हणाला, 'मी तुला इथें सोडणार नाहीं. महाराजांपुढें तुला उभा करीन नि त्यांच्याकडे तुझ्याबद्दल रदबदली करीन. त्यांनीं जर तुला क्षमा केली तर मी तुझी मोकळीक करीन.'

भोऊन त्यावर कांहींच बोलला नाहीं.



टीकमानें त्याला सम्राटासमोर उभें केलें नि त्याला सोडून देण्याची विनंति केली.

हर्षानें पूर्वीं निरपराधी लोकांना हत्तीकडून ठार मारविलें होतें. पूर्वीं त्यानें कुविचार केला होता; पण त्यानंतर त्यानें बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळें त्याचें अंतःकरणहि दयार्द्र बनलें होतें. आतां त्याला सुविचार सुचला नि त्यानें भोऊनला सोडून देण्याचा आदेश दिला.

भोलननें हर्षाला धन्यवाद दिल्यावर तो तिथून निघून गेला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं टीकम आपल्या घरांत बसला असतांना--

'बुद्धं सरणं गच्छामि ! धम्मं सरणं गच्छामि ! संघं सरणं गच्छामि !'

असा अंगणांतून आवाज आल्याचें त्यानें ऐकलें; म्हणून तो घरांतून बाहेर आला.

अंगणांत एक साधु उभा होता. त्याच्या अंगावर काषाय वस्त्रें होतीं. त्यानें आपल्या डोक्याचें मुंडन केलें होतें. त्याच्या हातांत एक कटोरा होता, तो त्यानें भिक्षेसाठीं पुढें केला !

टीकमनें त्याला ओळखलें. तो भोलन होता नि तो बौद्ध भिक्षु बनला होता !

**- समाप्त -**

प्र. सं. 98563 31/1/06
IRBK-0116563
IRBK-0116563